शिक्षण / आरोग्य / रोजगार / कला /क्रीडा / महिला सक्षमीकरण

# रयत विद्यार्थी विचार मंच

संस्थापक / अध्यक्ष : धम्मराज साळवे

- **कार्यअहवाल : सन २०१५ ते २०१७**

देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष झाल्यानंतर देखील आजही एक मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित आहे.अनेक विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण अर्ध्यावर सोडतात. मराठवाड्यातील एका विद्यार्थीनीने बस पास साठी २५० रूपये नाहीत म्हणून आत्महत्या केली. अनेक विद्यार्थी आपल्या शिक्षणाचे ओझे पालकांवर नको म्हणून शेतकरी कुटुंबातील विद्यार्थी अर्ध्यावर शिक्षण सोडतात किंवा आत्महत्या करतात.एवढ्या शुल्लक कारणांसाठी विद्यार्थ्यांनी अर्ध्यावर शिक्षण सोडणे किंवा आत्महत्या करणे हे अतिशय दुर्देवी आहे.आपल्या अवती भोवती अनेक गरजु, होतकरू विद्यार्थी शिक्षणापासुन वंचित राहतात त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणुन शैक्षणिक प्रगल्भ करणे हा देशाच्या विकासाचा पाया आहे. आपण सर्व विद्यार्थी मिळुन आपल्यातील गरजु व होतकरू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन त्यांना सक्षम करूया. याकरिता रयत विद्यार्थी विचार मंच कार्य करत आहे. आपणही या संकल्पनेत सहभाग घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मदतीचा हात पुढे करूया..

- **धम्मराज नवनाथ साळवे**

**संस्थापक / अध्यक्ष**




चला बनू भविष्य जगाचे...
art_bhagyashree





## दिनांक २० सप्टेंबर २०१५
## रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेची निर्मिती

रयत शिक्षण संस्थेच्या पिंपरी येथील महात्मा फुले महाविद्यालयांत शिक्षण घेत असताना कर्मवीरांच्या कार्याला व विचारांना प्रभावित होऊन आपण देखील शिक्षण क्षेत्रात कार्य केले पाहिजे,विद्यार्थी मित्रांनी एकत्र येऊन एकेमकांना शिक्षणास साहाय्य केले पाहिजे हि संकल्पना सुचली.आणि त्यावर कार्य सुरू केले.या कार्याची सुरवात करत असताना रयतच्या माध्यमातून शिक्षणाची ज्ञानगंगा तळागाळापर्यंत पोहचवणारे ज्ञानमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ज्या ठिकाणावरून शैक्षणिक क्रांतीस सुरवात केली त्या सातारा या ठिकाणी जाऊन त्यांना अभिवादन केले.








**दिनांक २६ सप्टेंबर २०१५**

**चर्चा सत्र : विषय- विद्यार्थी प्रश्न आणि रयत विद्यार्थी विचार मंच**

रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य ) अध्यक्ष -धम्मराज साळवे व पदाधिकारी आयोजित चर्चा सत्र सर्व सदस्य/विद्यार्थी महात्मा फुले महाविद्यालय येथे चर्चा सत्रास उपस्थित होते.





**दिनांक ०६ ऑक्टोबर २०१५**

**खराळवाडी या विद्यालयास भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे नाव देण्यात यावे**

माध्यमिक विद्यालय खराळवाडी या विद्यालयास भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे नाव देण्यात यावे या संदर्भात मा.महापौर शकुंतलाताई धराडे यानां निवेदन देताना अध्यक्ष : धम्मराज साळवे आणि पदाधिकारी.यावेळी मा.महापौर यांनी रयत विद्यार्थी विचार मंच च्या कार्यास शुभेच्छा दिल्या.

# खराळवाडी शाळेला डॉ. कलाम यांचे नाव देण्याची मागणी

**पिंपरी :** खराळवाडीतील मनपाच्या माध्यमिक विद्यालयास डॉ. अब्दुल कलाम यांचे नाव द्यावे, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने करण्यात आली आहे. महापौर शकुंतला धराडे यांना याबाबतचे निवेदन देण्यात आले. मंचाचे उपाध्यक्ष अक्षता बंदपट्टे, सचिव अमित कांबळे, शशिकांत कुंभार, मयूर गायकवाड, तृप्ती शिंदे, निखिल धेंडे, उमा लहाडे, प्रिया जाधव, आकाश हुंबरे, विशाल कांबळे, महेश आल्हाट, करन देडे, संदीप इमडे आदी या वेळी उपस्थित होते. निवेदनामध्ये नमूद केले आहे की, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्यापासून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते. विद्यार्थ्यांचे ते आदर्श असल्याने शाळेला त्यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

UNIVERSAL EDITION
सामना
सर्वांसाठी सर्वकाही
जगातील सर्वाधिक चर्चिले जाणारे एकमेव वृत्तपत्र



## ■ खराळवाडी विद्यालयाचे नामकरण करा

**पिंपरी :** महापालिकेच्या खराळवाडी येथील माध्यमिक विद्यालयाचे नामकरण 'भारतरत्न' डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम असे करावे, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबतचे निवेदन महापौर शकुंतला धराडे यांना देण्यात आले आहे. अध्यक्ष धनराज साळवे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने महापौरांना निवेदन दिले.

**दिनांक ०८ ऑक्टोबर २०१५**





**दिनांक २२ ऑक्टोबर २०१५**

**चिंचवड येथिल पुनरुत्थान गुरुकुल अनाथ आश्रमात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप**

रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने अशोका विजयादशमी,दसरा निमित्त चिंचवड येथिल पुनरुत्थान गुरुकुल अनाथ आश्रमात विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करताना .रयत विद्यार्थी विचार मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे आणि सर्व पदाधिकारी.

## अनाथ आश्रमातील मुलांना मदत करून दसरा साजरा

**पिंपरी :** दरसऱ्यानिमित्त चिंचवड येथील पुनरुत्थान समरसता गुरूकुलम या अनाथ अनाथ अश्रमातील मुलांना रयत विद्यार्थी विचार मंचातर्फे शैक्षणिक साहित्यासह खाऊ वाटप करून दसरा साजरा करण्यात आला.

मंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी अक्षता बंदपट्टे, अमित कांबळे, तृप्ती शिंदे, विशाल कांबळे, मयुर गायकवाड, आकाश हुंबरे, भूषण चौधरी, शशिकांत कुंभार, संदीप साखरे, नितीन खंदारे, पुजा कळसे, महेश झिंगुर्डे, राजेश कोरे, दया चिमगावे, अशितोष ठाकूर, कालिदास पोतदार, गीता शेलार, दिपक कांबळे, राम जाधव, प्रिया जाधव, उमा लहाडे, उज्वला कदम आदी उपस्थित होते.

**दिनांक २३ ऑक्टोबर २०१५**



**दिनांक २४ ऑक्टोबर २०१५**

रयत विद्यार्थी विचार मंच प्रथम कार्यकारणी टीम





**दिनांक १० नोव्हेंबर २०१५**

**दीपावली निमित्त  किनारा वृध्द व मतिमंद आश्रम येथे दीपावलीचे साहित्य व खाऊवाटप**

रयत विद्यार्थी विचार मंच शाखा चिखली जाधववाडी यांच्या वतीने  दीपावली निमित्त  किनारा वृध्द व मतिमंद आश्रम येथे दीपावलीचे साहित्य व खाऊवाटप करण्यात आले. यावेळी अध्यक्ष- धम्मराज  साळवे व महेश झिंगुरडे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले...प्रमुख उपस्थिती - सागर बनसोडे,मयुर गायकवाड,अमित कांबळे,शशिकांत कुंभार,सतिश पटेकर व सर्व पदाधिकारी व सदस्य शाखा- चिखली  जाधववाडी

## ■ वृद्धाश्रमातील ज्येष्ठांसाठी दिवाळी साहित्य

चिखली : रयत विद्यार्थी विचार मंच, जाधववाडी शाखेतर्फे किनारा वृद्ध आणि मतिमंद आश्रमात दिवाळी साहित्य भेट देण्यात आले. शाखाप्रमुख महेश झिंगुरडे, महात्मा फुले महाविद्यालय विद्यापीठ प्रतिनिधी सागर बनसोडे यांच्या हस्ते तेल बॉटल, कंगवा, साबण, बिस्कीट, फळे आदी साहित्य दिले. धम्मराज साळवे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास अमित कांबळे, मयूर गायकवाड, शशिकांत कुंभार, सतीश पटेकर, वैभव मोहिते, शिवराज पवार, स्वप्नील गायकवाड, रोहित पारधी, कृष्णा भोसले, विष्णू भोसले, उत्तम झिंगुरडे, हृषीकेश तायडे, आकाश गायकवाड, धनंजय खाळपे, गजानन तोडे, विशाल थोरात, विशाल शहा, गुलाबराव वारके, महेश जाधव, उमेश वारके उपस्थित होते.

**दिनांक १७ नोव्हेंबर २०१५**

# पेट्रोल पंपावरील थांबवा फसवणूक

धम्मराज साळवे ● पिंपरी



◆ फसवणूक करणे हा सर्वात मोठा गुन्हा आपल्या स्वच्छ, सुंदर प्रगतिशील शहरात होताना दिसून येतो; ही आपल्या शहरवासीयांसाठी अत्यंत निंदणीय बाब आहे. याकडे शासनाने व ग्राहक संरक्षण समितीने लक्ष देणे गरजेचे आहे. हा साठेबाजी, भ्रष्टाचार, घोटाळा अशाच प्रकारे होत राहणे चुकीचे आहे. प्रत्येक नागरिकाने इंधन भरताना लक्षपूर्वक भरुन घेतले पाहिजे व जागरुक झाले पाहिजे.

आपले पिंपरी-चिंचवड शहर हे स्मार्ट सिटी औद्योगिकनगरी म्हणून ओळखले जाते. आपल्या शहरात वाहतुकीचे अनेक साधने आहेत. अनेक वाहने मोठ्या प्रमाणात शहरात रहदारी करतात.

शहरातील नागरिक हे सद्य:स्थितीत धावपळीचे जीवन जगत आहेत. अशा परिस्थितीमध्ये पिंपरी-चिंचवडमधील अनेक पेट्रोल पंप हे सामान्य जनतेची फसवणूक करताना दिसतात. शहरातील पेट्रोल पंपाचे फसवणुकीचे/भ्रष्टाचाराचे मोठ्या प्रमाणात सत्र सुरु आहे. पंपावरील कर्मचारी हे ग्राहकास बोलण्यात गुंतवून पेट्रोल अथवा डिझेल भरताना काटा मारतात.

ग्राहकाने रीडिंग पाहण्याअगोदरच इंधन भरण्यास सुरुवात करतात. या गडबडीमध्ये ग्राहकाला आपली झालेली फसवणूक समजून येत नाही. अनेक वेळा हा अनुभव आलेला आहे. एक कर्मचारी बोलण्यात गुंतवून ठेवतो व इंधन भरणारा कर्मचारी हा ग्राहकाच्या नकळत पेट्रोल भरण्यास सुरुवात करतो. यामुळे ग्राहकाला कळून येत नाही व घाई असल्याने ग्राहक पैसे देऊन निघून जातो. जेव्हा त्या कर्मचाऱ्यांना जाब विचारला जातो तेव्हा ते कर्मचारी ग्राहकास शांत करून त्या ग्राहकाच्या वाहनात पुन्हा उर्वरित इंधन भरतात. अनेक वेळा जाब विचारला असता कर्मचारी उडवाउडवीचे उत्तर देतात.

ही फसवणूक अधिक प्रमाणात केलेली दिसून येते. या सर्व बाबीकडे पेट्रोलपंप मालकाचे दुर्लक्ष दिसून येते अथवा मालकसुद्धा या गुन्ह्यामध्ये सहभागी दिसून येतो.

(लेखक रयत विद्यार्थी मंचाचे अध्यक्ष आहेत.)

**दिनांक २० नोव्हेंबर २०१५**
**दैनिक लोकमत**




**दिनांक २५ नोव्हेंबर २०१५**

**'मूल शाळेत जाते,पण ते शिकले पाहिजे'**

पिंपरी : वस्तीतील प्रत्येक मूल शाळेत जाते; पण ते शिकले पाहिजे, या उद्देशाने प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने 'लाखात एक' रॅलीचे आयोजन पिंपरी येथे करण्यात आले. या अभियानातून भारतातील एक लाख गाव आणि शहर येथील वस्त्यांमधील शैक्षणिक स्तरात बदल घडवण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. पिंपरीतील बौद्धनगर, गांधीनगर, खराळवाडी या ठिकाणी एकत्रितपणे अभियानाचा समारोप झाला. वैशाली मोरे,मा. धम्मराज साळवे, (रयत विद्यार्थी विचार मंच) भंडारे, मनीषा अहिरे यांनी मार्गदर्शन केले. जया शिरकरे, ललिता कांबळे, महानंदा शिगाडे, कोमल भडारे उपस्थित होते.






**दिनांक २६ नोव्हेंबर २०१५**

**संविधान दिन उत्साहात साजरा. ...**

रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करूण संविधान प्रस्ताविके समोर प्रस्ताविकाचे सामुहिक वाचन करण्यात आले व २६/११ हल्ल्यातिल शहिदांना आदरांजली अर्पण करण्यात आले...अध्यक्ष- मा.धम्मराज साळवे,ॲड.तारीफभाई शेख,मा.ललिता भंडारे , मा.सागर बनसोडे यांनी मार्गदर्शन केले....यावेळी मयुर गायकवाड,अमित कांबळे, तृप्ती शिंदे,प्रिया जाधव,अक्षता बंदपट्टे,ललिता कांबळे,विशाल कांबळे,दिपक कांबळे प्रमुख उपस्थित होते.

# संविधान दिन विविध कार्यक्रमांनी साजरा

**पिंपरी : शहरात** विविध ठिकाणी भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्त झालेल्या कार्यक्रमात पूजन, ध्वजवंदन, सामुहिक वाचन करण्यात आले.

**एच. ए. हायस्कूल**

एच. ए. हायस्कूलमध्ये संविधान दिन साजरा झाला. तिरंदाजीत १८ वेळा गोल्ड मिळविलेला शाळेचा विद्यार्थी किरण गायकवाड या विद्यार्थ्याच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली.

या वेळी संविधानाच्या घोषणा व भाषणे झाली. मुख्याध्यापक ए. ह. बुरसे यांनी विद्यार्थ्यांना संविधान निर्मितीची प्रक्रिया समजावून सांगितली. राजू गायकवाड यांनी अभिवंदना केली. या वेळी पालक संघ उपाध्यक्ष कैलास शिंदे, बळवंत सुर्वे, दत्तात्रय कोळी, मनीषा कदम आदी उपस्थित होते.

**भारतीय बौद्ध विचारमंचाच्या वतीने सामूहिक वाचन**

◆ भारतीय बौद्ध विचार मंचाच्या वतीने गुरुवारी संविधान दिनानिमित्त संविधान प्रस्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौक येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. सामूहिक संविधान वाचन कार्यक्रमामध्ये शहरातील बौद्धविहारा अध्यक्ष व प्रतिनिधी उपस्थित होते. समाजातील विविध स्तरांतील बांधव उत्साहाने सहभागी झाले. कार्यक्रमासाठी राहुल आखाडे, विकास बारभुवन, नितीन ससाने, विजय कांबळे, रमेश जाधव, प्रदीप पवार यांनी विशेष प्रयत्न केले.

**न्यू इंग्लिश स्कूल**

रयत शिक्षण संस्थेच्या भोसरी येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये झालेल्या कार्यक्रमात विद्यालयाचे मुख्याध्यापक ए. एच. गिरमकर यांनी संविधानाच्या प्रतिमेचे पूजन केले. शिक्षकांनी संविधानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. सर्वांनी सामूहिकरीत्या संविधानाचे वाचन केले.

मयूरी चव्हाण, तेजस लोंढे, संगीता थोराजी, योगेश गिरी, सुशील माने या विद्यार्थ्यांनी संविधान दिनावर भाषण केले. २६/११च्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

एम. एस. अहिरेकर, डी. बी. शिंदे, डी. जी. घुले हे उपस्थित होते. एम. एस. वाघमारे यांनी प्रास्ताविक केले. आर. एन. काकडे यांनी संयोजन केले. एस. के दुंडे यांनी आभार मानले.

**रयत विद्यार्थी मंच**

रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. २६/११ला झालेल्या हल्ल्यातील शहिदांना आदरांजली वाहण्यात आली. या वेळी धम्मराज साळवे, तारिफ शेख, ललिता भंडारे, सागर बनसोडे, विशाल खुणे, अक्षता बंदपट्टे आदी उपस्थित होते.

**बीना इंग्लिश मीडियम स्कूल**

आकुर्डीतील बीना इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी संविधान सभेत दिलेल्या अंतिम भाषणाचे वाचन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मौलाना अब्दुल गफ्फार यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले.

इक्बाल खान यांनी २६/११ मुंबई दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या हेमंत करकरे, विजय साळसकर, अशोक कामठे, संदीप उन्नीकृष्णन यांना श्रद्धांजली वाहिली. संस्थेचे कोषाध्यक्ष हमजा खान, अकमल खान, सरचिटणीस आजम खान, मतलूब उस्मानी, अब्दुल्लाह खान आदी उपस्थित होते. (प्रतिनिधी)

दिनांक २७ नोव्हेंबर २०१५



**दिनांक २८ नोव्हेंबर २०१५**

**महात्मा फुले स्मृतीदिन**

रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुण अभिवादन करण्यात आले. मा.धम्मराज साळवे यांनी मनोगत व्यक्त केले यावेळी सागर बनसोडे,शशिकांत कुंभार,मयुर गायकवाड,अमित कांबळे,तृप्ती शिंदे,अक्षता बंदपट्टे ,प्रिया जाधव,निखिल धेंडे,उमेश झिंगुर्डे,प्रकाश भोले उपस्थित होते.





**दिनांक ०१ डिसेंबर २०१५**
**लैंगिक व HIV जनजागृती**

जागतिक एड्स दिना निमित्त लैंगिक व HIV जनजागृती पुस्तिका पिंपरी चौक येथे वाटप करताना व जनजागृती करताना अध्यक्ष धम्मराज साळवे







**दिनांक ०६ डिसेंबर २०१५**
**विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिना** निमित्त अभिवादन अनेक कार्यक्रमाव्दारे अभिवादन करण्यात आले.

# नेल्सन मंडेला यांचे विचार जनतेत रुजावे : गायकवाड

**पिंपरी** : नेल्सन मंडेला यांनी वर्णभेदाविरुद्ध आयुष्यभर लढाई दिली. समता प्रस्थापित करण्याचा त्यांचा आग्रह होता. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर आपले संपूर्ण जीवन त्यांनी व्यतित केले. त्यांचे हे विचार सर्व जनमनात जाणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन सूरज गायकवाड यांनी व्यक्त केले.

रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला यांना त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. पिंपरी येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले. उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून त्यांना आदरांजली वाहिली.

प्रिया जाधव, तृप्ती शिंदे, शशिकांत कुंभार, सोमेश्वर निसर्गन्ध, सुमित भालेराव, महेश जगताप आदींसह विद्यार्थी व पदाधिकारी या वेळी सदस्य उपस्थित होते. धम्मराज साळवे म्हणाले की, नेल्सन मंडेला यांनी वर्णभेदाचा लढा लढताना २७ वर्षे तुरुंगवास भोगला. त्यांनी आपल्या आयुष्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांना आपले मार्गदर्शक मानले. प्रत्येक नागरिकाने राष्ट्राच्या विकासाकडे लक्ष द्यावे.

# नेल्सन मंडेला यांना आदरांजली

## पिंपरीतील उपक्रम : रयत विचार मंचचा पुढाकार

**पिंपरी, दि. ५ (प्रतिनिधी)** - रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला यांना स्मृतिदिनानिमित्त आदरांजली वाहण्यात आली.



पिंपरीतील महात्मा फुले महाविद्यालयात हा कार्यक्रम झाला. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, शहराध्यक्ष सूरज गायकवाड, सचिव प्रिया जाधव, सहसचिव तृप्ती शिंदे, शशिकांत कुंभार, मयूर गायकवाड, निखिल धेंडे, संतोष शिंदे, अजय शेरखाने, अमित कांबळे, विशाल कांबळे, उमा खडे, अक्षता बंदपट्टे, सतीश पाटेकर, सोमेश्वर निसर्गंध, सुमित भालेराव, महेश जगताप, आकाश हुंबरे आदी उपस्थित होते.

### महात्मा फुले महाविद्यालयात कार्यक्रम

धम्मराज साळवे म्हणाले की, नेल्सन मंडेला यांनी वर्णभेदाचा लढा लढताना त्यांना २७ वर्षे तुरुंगवास भोगावा लागला. त्यांनी आपल्या आयुष्यात विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी याना आपले मार्गदर्शक मानले. सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचा आदर्श घ्यावा व जातीभेद, वर्णभेद, वंश भेद, धर्म भेद यांना झुगारून राष्ट्राचा विकास याकडे लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

सूरज गायकवाड म्हणाले, नेल्सन मंडेला हे वर्णभेदाच्या विरुद्ध लढणारे आणि समता प्रस्थापित करण्यासाठी आयुष्यभर झगडले. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले. त्यांचे विचार सर्व जनमनात जावेत, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

**दिनांक ६ डिसेंबर २०१६**
**नेल्सन मंडेला यांच्या स्मृतिदिन**
नेल्सन मंडेला यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन पर कार्यक्रमाची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल

# नेल्सन मंडेला यांना अभिवादन

**पिंपरी :** वर्णभेदाच्या विरोधात लढणारे नोबेल पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला यांना त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

मंडेला हे वर्णभेदाच्या विरुद्ध आणि समता प्रस्थापित करण्यासाठी आयुष्यभर झगडले. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेवर आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले. त्यांचे विचार जनामनात जावेत, अशी भावना मंचाचे शहराध्यक्ष सूरज गायकवाड यांनी व्यक्त केली. संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनीही भावना व्यक्त केल्या.

कार्याध्यक्ष विशाल कांबळे, उपाध्यक्ष अमित कांबळे, शशिकांत कुंभार, सचिव प्रिया जाधव, तृप्ती शिंदे, मयूर गायकवाड, निखिल धेंडे, संतोष शिंदे, अजय शेरखाने, उमा खडे, अक्षता बंदपट्टे, सतीश पाटेकर, सोमेश्वर निसर्गन्ध, सुमित भालेराव, महेश जगताप, आकाश हुंबरे आदी उपस्थित होते. (प्रतिनिधी)



**पिंपरी : रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करताना कार्यकर्ते.**

संतोष शिंदे, अजय शेरखाने , अमित कांबळे, विशाल कांबळे, उमा खडे, अक्षता बंदपट्टे, सतीश पाटेकर, सोमेश्वर निसर्गन्ध, सुमीत भालेराव, महेश जगताप, आकाश हुंबरे विद्यार्थी उपस्थित होते.

**दिनांक ५ जानेवारी २०१७ दैनिक पुढारी**
**क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती**




पुढारी

संक्षिप्त

माता रमाई यांच्या महानिर्वाण दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

My Pimpri
Page No. 03 May 29, 2017
Powered by: erelego.com



HighLights

## रमाई आंबेडकरांना अभिवादन

**पिंपरी :** रमाई भीमराव आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त रयत विद्यार्थी विचारमंचाच्या वतीने त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात झालेल्या या कार्यक्रमाला मंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, अर्पिता वाघमारे, शशिकांत कुंभार, आनंद विजापुरे, अक्षता बंदपट्टे, अजय शेरखाने, आदित्य कांबळे, निखिल धेंडे, महेश जगताप, अक्षय साबळे, सूरज कसबे, संतोष शिंदे, शशिकांत कुंभार आदी उपस्थित होते.

**दिनांक २९ मे २०१७**

**माता रमाई आंबेडकर स्मृतिदिन**

माता रमाई आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिम्मित रयत विद्यार्थी विचार मंचाचे अभिवादन



**दिनांक १३ जुन २०१७**

**दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांच्या बक्षीसाबाबत पुनर्विचाराची मागणी**

दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांच्या बक्षीसाबाबत पुनर्विचाराची मागणी रयत विद्यार्थी विद्यार्थी विचार मंच संस्थेचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका स्थायी समिती अध्यक्ष  यांना निवेदन



पुढारी

# गुणवंतांच्या बक्षिसाबाबत पुनर्विचाराची मागणी

**पिंपरी : प्रतिनिधी**

दहावी-बारावी गुणवंत विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या बक्षिसासंदर्भात पुन्हा विचार व्हावा, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने करण्यात आली आहे.

याबाबत मंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या नेतृत्वाखाली स्थायी समिती सभापती सीमा सावळे यांना निवेदन देण्यात आले. यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या १९ माध्यमिक विद्यालयांमध्ये गरीब, कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थी ८ वी ते १० वी माध्यमिक चे शिक्षण घेत असतात व खासगी विद्यालयांतील विद्यार्थ्यांपेक्षाही अधिक गुण मिळवतात. गरीब, कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थी असल्यामुळे महापालिकेच्या वतीने दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षेमध्ये ८० टक्क्यांच्या पुढे गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्याला पुढील शिक्षणास अर्थसाह्य व्हावे म्हणून आर्थिक स्वरूपात बक्षीस दिले जाते. नुकत्याच झालेल्या स्थायी समिती बैठकीतील निर्णयामुळे विद्यार्थी व पालकांत नाराजी आहे; कारण दर वर्षी गुणवंत विद्यार्थ्यांना ८० ते ८५ टक्क्यांपर्यंत गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना २५ हजार रु. ८५ ते ९० टक्क्यांपर्यंत गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना ५० हजार रु. व ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना १ लाख रुपये या पद्धतीने बक्षीस दिले जात होते.या पूर्वीप्रमाणेच बक्षिसाची रक्कम ठेवावी, जेणेकरून विद्यार्थ्यांना आर्थिक आधार मिळेल. त्यांच्या शैक्षणिक भविष्याला न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे.

**महापालिका स्थायी समितीच्या अध्यक्षा सीमा साळवे यांना निवेदन देताना रयत विद्यार्थी विचार मंचाचे पदाधिकारी.**

Pimpri
Page No. 05 Jun 16, 2017
Powered by: erelego.com

दिनांक १६ जून  २०१७

## राजमाता जिजाऊंना पिंपरीत अभिवादन

**पिंपरी :** राजमाता जिजाऊ यांच्या स्मृतिदिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. पिंपरी येथे पार पडलेल्या या कार्यक्रमाला शहर उपाध्यक्ष शशिकांत कुंभार, सल्लागार निखिल धेंडे, आदिनाथ कांबळे, स्वप्निल ननावरे, अजय शेरखाने , सतीश पटेकर, सोमेश्वर निसर्गंध, सुमित भालेराव, महेश जगताप, आकाश हुंबरे आदी विद्यार्थी, पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

**दिनांक १९जून २०१७ ( दैनिक पुढारी )**

**राजमाता जिजाऊ स्मृतिदिन**

पुढारी

## शाहू महाराजांना अभिवादन

**पिंपरी :** छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले.

शाहूनगर, चिंचवड येथील छत्रपती शाहू महाराजांच्या पुतळ्यास संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे आणि महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. रयत विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी मनोगत व्यक्त केले. शशिकांत कुंभार, निखिल धेंडे, आदिनाथ कांबळे, स्वप्निल ननावरे, अजय शेरखाने, सतीश पटेकर, सोमेश्वर निसर्गंध आदी उपस्थित होते.

Pimpri
Page No. 07 Jun 29, 2017
Powered by: erelego.com

लोकमत

## शाहूमहाराजांना अभिवादन

### भाषणांमधून कार्याबद्दल व्यक्त केली कृतज्ञता

लोकमत न्यूज नेटवर्क

**रहाटणी :** येथील क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले संचालित,न्यू सिटी प्राईड इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये राजर्षी छत्रपती शाहूमहाराज जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. त्यानिमित त्यांच्या प्रतिमेस शाळेच्या मुख्याध्यापिका अरुंधती अभंग यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी संस्थेचे संस्थापक अरुण चाबुकस्वार, श्रावणी पत्रनाभीष,राखी

**शाहूमहाराज यांचे विचार समता मूलक : साळवे**

◆ पिंपरी : लोकराजा छत्रपती शाहूमहाराज यांच्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे आणि महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते शाहूनगर येथील पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. लोकराजा छत्रपती शाहूमहाराज हे आरक्षणाचे जनक आहेत. कुराणचे मराठी भाषेत रुपांतर व्हावे यासाठी त्यांनी प्रयत्न केले. जातिभेदाला विरोध करणारे व समतेचे तत्त्व जोपासणारे राजे म्हणजे लोकराजा छत्रपती शाहूमहाराज यांचे विचार हे समता मूलक आहेत, असे मत साळवे यांनी व्यक्त केले. या वेळी शशिकांत कुंभार, निखिल धेंडे, आदिनाथ कांबळे, स्वप्नील ननावरे, अजय शेरखाने, सतीश पटेकर, सुमित भालेराव, महेश जगताप, आकाश हुंबरे आदी विद्यार्थी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

दिनांक २९ जून २०१७

छत्रपती शाहू महाराज जयंती



पुढारी

## अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

**पिंपरी :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या ४८ व्या स्मृतिदिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने निगडी येथील अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास मंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी शशिकांत कुंभार, अक्षता बंदपट्टे, अर्पिता वाघमारे, आदिनाथ कांबळे, महेश आल्हाट, प्रतीक वाघमारे, महेश जगताप, अजय शेरखाने आदी उपस्थित होते. यावेळी धम्मराज साळवे म्हणाले, अण्णा भाऊ यांनी अवघा दीड दिवस शाळेत जाऊन अनेक साहित्य-कादंबऱ्या ग्रंथांची खाण निर्माण केली. अवघा दीड दिवस शाळेत जाऊन सुद्धा अण्णा भाऊंनी नेहमी विज्ञानवादी विचार मांडले. ते म्हणत, पृथ्वी शेषनागाच्या मस्तकावर नाही, तर दलित श्रमिकांच्या तळहातावर तरलेली आहे. एवढा विज्ञानवादी विचार अण्णा भाऊंनी मांडला, त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने अण्णा भाऊंच्या साहित्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.



प्रभात 13/18

## अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

**पिंपरी –** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुण्यतिथीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने निगडी येथील अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शशिकांत कुंभार, अक्षता बंदपट्टे, अर्पिता वाघमारे, आदिनाथ कांबळे, महेश आल्हाट, प्रतीक वाघमारे, महेश जगताप, अजय शेरखाने आदी पदाधिकारी उपस्थित होते.

दिनांक २१ जुलै २०१७

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे स्मृतिदिन



**दिनांक ७ ऑगस्ट २०१७**

**बेरोजगारांचा भव्य मेळावा**

गौतम चाबुकस्वार युवा मंच पिंपरी आयोजित बेरोजगारांचा भव्य_मेळावा दि. १२-८-२०१७ या कार्यक्रमात रयत विद्यार्थी विचार मंच सदस्य पदाधिकारी सहभागी व्हावे यासाठी संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे यांना कार्यक्रमाची निमंत्रण पत्रिका देताना आमदार गौतम चाबुकस्वार



दिनांक ०१ ऑगस्ट २०१७

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिम्मित अभिवादन

## रयत विचार मंचातर्फे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन



पिंपरी, दि. २ (प्रतिनिधी) - साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंचाचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे, अंजना गायकवाड यांच्या हस्ते निगडीतील अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालण्यात आला. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांना लेखन व वाचनाची आवड होती. त्यामुळे ते जगात साहित्यरत्न ठरले. त्यांच्या कादंबऱ्या, नाट्य लेखन, साहित्य यातून समाज जीवनाचे दर्शन होते. जग बदल घालुनी घाव सांगून मज गेले भीमराव, या काव्यातून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विद्वतेचा गौरव केला आहे, असे मत धम्मराज साळवे यांनी मांडले. यावेळी शशिकांत कुंभार, आदिनाथ कांबळे, हर्षाली डावरे, अजय लोंढे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष शिंदे यांनी केले. शशिकांत कुंभार यांनी आभार मानले.




दिनांक ०२ ऑगस्ट २०१७

# देशातील तरुणांनी आता उद्योगांकडे वळावे!

## अशोक धुरंधर यांचे मत : 'मी उद्योजक होणार' मेळावा उत्साहात



पिंपरी : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या 'मी उद्योजक होणार' या मेळव्यात उपस्थितांना मार्गदर्शन करताना उद्योजक अशोक धुरंधर.

**पिंपरी, दि.५ (प्रतिनिधी)**- सध्या सरकारी नोकरी मिळविणे महाकठीण झाले आहे. याशिवाय खासगी क्षेत्रातही रोजगार निर्मिती होत नसल्याने बेरोजगारांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे राज्य सरकाराच्या विविध योजनांचा लाभ घेत, तरुणांनी उद्योगांकडे वळावे, असे आवाहन उद्योजक अशोक धुरंधर यांनी केले.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या 'मी उद्योजक होणार' या मार्गदर्शन मेळव्यात उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पिंपरीतील कै. नारायण मेघाजी लोखंडे कामगार भवनात शुक्रवारी (दि.४) पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एमआयएमचे शहराध्यक्ष अकील मुजावर होते. या कार्यक्रमाला धम्मराज साळवे, अंजना गायकवाड, अजय लोंढे, अनिता सावळे, रवींद्र सावळे, संदीप

**लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त उपक्रम**

पिसाळ, भीमराव तुरुकमारे, सुधीर धुतमल, भारत मीरपगार, विनोद भिसे, सर्वजीत बनसोडे व युवक युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी धुरंधर म्हणाले की, खासगी क्षेत्रातील कंत्राटी स्वरुपाच्या नोकऱ्यांसाठीदेखील आता जीवघेणी स्पर्धा सुरू झाली आहे. मात्र, केवळ नोकरीच्या मागे न धावता, रोजगारनिर्मितीसाठी युवकांनी पुढाकार घ्यावा. याकरिता केंद्र व राज्य सरकारच्या वतीने स्वयंरोजगार निर्मितसाठी अनेक योजना आहेत. याचा लाभ घ्यावा. याकरिता शास्त्रोक्त पद्धतीने प्रकल्प अहवालसारख्या तांत्रिक बाबींवर लक्ष द्यावे. अजय लोंढे यांनी प्रास्ताविकात मेळाव्याच्या आयोजनाची माहिती दिली. अनिता सावळे यांनी सूत्रसंचालन केले. धम्मराज साळवे यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाकरिता मैत्री चळवळ, लोकशाही संस्था, साई गर्जना मित्र मंडळ, क्रांतिसूर्य लहुजी वस्ताद साळवे प्रतिष्ठान, ध्यास ग्रुप अपना वतन संगटना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ग्रुप, सिंहनाद ग्रुप व रयत विद्यार्थी मंचच्या पदाधिकाऱ्यामनी विशेष परिश्रम घेतले.

**दिनांक ५ ऑगस्ट २०१७**

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिम्मित ' मी उद्योजक होणार ' मेळावा**

रयत विद्यार्थी विचार मंच व अनेक सामाजिक संघटनांच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिम्मित ' मी उद्योजक होणार ' मेळावा घेण्यात आला. त्या कार्यक्रमाची दैनिक पुढारीने घेतलेली दखल.



## दिनांक ८ ऑगस्ट २०१७
## ओबीसी विद्यार्थी शिष्यवृत्ती कपातीला विरोध

केंद्र सरकारने ओबीसी विद्यार्थी शिष्यवृत्ती ५५९ कोटी वरून ५४ कोटी केली ही कपात रद्द करण्यात यावी यासंदर्भात उपजिल्हाधिकारी मुठे साहेब यांना निवेदन देताना रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे आणि शशिकांत कुंभार

# 'ओबीसी' शिष्यवृत्ती कपातीला विरोध

## रयत विचार मंच : उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन; निर्णय रद्द करण्याची मागणी

**पिंपरी, दि.८ (प्रतिनिधी)-** केंद्र सरकारने ओबीसी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेत कपात केली आहे. या रक्कम कपातीला रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने विरोध दर्शवला आहे. ही कपात रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन उपजिल्हाधिकारी राजेंद्र मुठे यांना धम्मराज साळवे यांनी दिले आहे.

केंद्र सरकारने मागील दोन वर्षांमध्ये ओबीसी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीच्या रकमेत मोठी कपात केली आहे. यामुळे ओबीसी विद्यार्थ्यांपुढे शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तीन वर्षांपूर्वी दिलेल्या ५०० कोटींच्या अनुदानाला केंद्र सरकारने मोठी कात्री लावली असून, यंदा केंद्राने केवळ ५४ कोटी रुपयांची रक्कम ओबीसी शिष्यवृत्तीसाठी दिली आहे.

राज्यातील अल्प उत्पन्न गटातील ओबीसी विद्यार्थ्यांच्या उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार करण्यासाठी केंद्र सरकारकडून या विद्यार्थ्यांना मॅट्रिकेतर वैद्यकीय, अभियांत्रिकी अशा व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी १९९७-९८ पासून ही शिष्यवृत्ती दिली जाते. मात्र राज्य सरकारने ही शिष्यवृत्ती योजना २००५-०६ पासून लागू केली, त्यातही केवळ ५० टक्केच शिष्यवृत्तीची रक्कम राज्य सरकारकडून ओबीसी विद्यार्थ्यांना दिली जात होती. केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या या शिष्यवृत्तीवर राज्यातील लाखो ओबीसी विद्यार्थी शिक्षण घेत असतात. मात्र मागील दोन वर्षांपासून केंद्र सरकारने या ओबीसी शिष्यवृत्तीच्या रकमेत अचानक मोठी कपात केली आहे. केंद्र सरकारच्या शिष्यवृत्तीचा फायदा घेणारे जवळपास साडेआठ लाख ओबीसी विद्यार्थी राज्यात आहेत. मात्र केंद्र सरकारने अचानक शिष्यवृत्तीच्या रकमेत मोठी कपात केल्याने मागील दोन वर्ष ओबीसी विद्यार्थ्यांसमोर शिक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. ही बाब लक्षात घेऊन ही कपात रद्द करण्याची मागणी या निवेदनात केली आहे.



पुणे : केंद्र सरकारच्या वतीने ओबीसी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक शिष्यवृत्तीच्या रकमेत केलेली कपात रद्द करण्याच्या मागणीचे निवेदन उप जिल्हाधिकारी राजेंद्र मुठे यांना देण्यात आले.

## दिनांक ९ ऑगस्ट २०१७



दिनांक ९ ऑगस्ट २०१७
रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने प्रतिसरकार क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.



पिंपरीगाव : क्रांतिसिंह नाना पाटील यांना रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने अभिवादन करताना मान्यवर.

## रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने क्रांतिसिंह नाना पाटील यांना अभिवादन

**पिंपरी, दि. ९ (प्रतिनिधी) –** क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंती निमित्त रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पिंपरीगाव येथील महात्मा फुले महाविद्यालय, प्रांगणात अभिवादन करण्यात आले. या वेळी अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, उपाध्यक्षा अंजना गायकवाड, शशिकांत कुंभार, आदिनाथ कांबळे, हर्षाली डावरे, शशिकांत कुंभार प्रमुख उपस्थित होते. यावेळी धम्मराज साळवे म्हणाले, ब्रिटिश शासनाला समांतर अशी शासन यंत्रणा उभी केली पाहिजे, असा नाना पाटलांचा विचार होता. आपुला आपण करू कारभार' हे सूत्र चले जाव चळवळीत प्रत्यक्ष अंमलात आणले. आपल्या देशाचा कारभार आपणच केला पाहिजे या जाणिवेतून प्रतिसरकार ही संकल्पना नानांनी प्रत्यक्षात आणली होती. यांच्यावर महात्मा फुले यांच्या सत्यशोधक विचारांचा तसेच राजर्षी शाहूंच्या कार्याचा प्रभाव होता. तसेच शिक्षण प्रसार, ग्रंथालयांची स्थापना, अंधश्रद्धा निर्मूलन, ग्रामीण जनतेची व्यसनमुक्ती या माध्यमातून समाजसुधारणेचे कार्य केले. विद्यार्थ्यांनी क्रांतीसिह नाना पाटील यांचेकडून कणखरपणा हे तत्व घ्यावे, असे आवाहन साळवे यांनी केले. संतोष शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. शशिकांत कुंभार यांनी आभार मानले.



लोकमत

## नाना पाटील यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

नाना पाटील यांनी ग्रामीण जनतेला गुलामगिरीची जाणीव करून देऊन, जनतेला धाडसी बनवण्याचा प्रयत्न केला. नानांवर वारकरी संप्रदायाचा प्रभाव होता. तसेच लोकांच्या भाषेत प्रभावी भाषण करुन, त्यांच्यात प्रेरणा उत्पन्न करण्याची हातोटी होती. ग्रामीण भागातील, बहुजन समाजातील लोकांचा स्वाभिमान जागृत करुन त्यांना स्वातंत्र्य चळवळीत सहभागी करुन घेणे हे क्रांतिसिंहांचे प्रमुख योगदान होय, असे मत साळवे यांनी व्यक्त केले. या वेळी उपाध्यक्षा अंजना गायकवाड, शशिकांत कुंभार, आदिनाथ कांबळे, हर्षाली डावरे, शशिकांत कुंभार उपस्थित होते. संतोष शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 3 Aug 10, 2017
Powered by: erelego.com

दिनांक १० ऑगस्ट २०१७





**२६ ऑगस्ट २०१७**

**मदर तेरेसा जयंती**

मदर तेरेसा जयंती व  सर्व वैयक्तिक_खर्च टाळुन प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांचा वाढदिवस सामाजिक जाणीवेतुन व्हावा व मदर तेरेसांच्या कार्याला समर्पित व्हावा यासाठी रयत_विद्यार्थी_विचार_मंचाच्या माध्यमातुन आकुर्डी येथील नचिकेत_अनाथाश्राम या ठिकाणी अनाथ मुलांना रयतचे संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे व संतोष शिंदे यांच्य हस्ते मुलांना शालेय_साहित्य व आरोग्यविषयक_ साहित्य  व बिस्कीट_खाऊ वाटप करण्यात आले.

**लोकमत**

# नचिकेत आश्रमात खाऊवाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** मदर तेरेसा यांच्या जयंतीचे औचित्य साधत रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने आकुर्डी येथील नचिकेत बालआश्रम येथील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व खाऊवाटप करण्यात आले.

शालेय साहित्य, आरोग्यविषयक सफाई साहित्य व खाऊवाटप संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते झाले. साळवे, शिंदे आदींनी मनोगत व्यक्त केले. आश्रमातील विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त केले. रयत विद्यार्थी विचार मंच, मैत्री चळवळ, ध्यास ग्रुप यांनी सहकार्य केले.

उपाध्यक्ष संदेश पिसाळ, कार्याध्यक्षा अंजना गायकवाड, खजिनदार शशिकांत कुंभार, नीरज भालेराव, हर्षाली डावरे, संदीप पिसाळ, प्रमोद सूर्यवंशी, नीलेश निकाळजे, अशोक गायकवाड, रवींद्र सावळे, अनिता सावळे, स्वप्निल पिसाळ आदी उपस्थित होते. खाऊवाटपामुळे विद्यार्थी आनंदी दिसत होते.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 5 Aug 28, 2017
Powered by: erelego.com

**पुढारी**



रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने नचिकेत बालकाश्रम येथील मुलांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आला.

# अनाथ मुलांना शालेय साहित्य वाटप

**पिंपरी : प्रतिनिधी**

मदर तेरेसा यांच्या जयंतीचे औचित्य साधत रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने नचिकेत बालकाश्रम येथील मुलांना शालेय साहित्य व खाऊ वाटप करण्यात आले.


याप्रसंगी मंचचे संस्थापक धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, उपाध्यक्ष संदेश पिसाळ, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, खजिनदार शशिकांत कुंभार, नीरज भालेराव, हर्षाली डावरे, संदीप पिसाळ, प्रमोद सूर्यवंशी, नीलेश निकाळजे, अशोक गायकवाड, रवींद्र सावळे, अनिता सावळे, स्वप्नील पिसाळ आदी उपस्थित होते.या कार्यक्रमात अध्यक्ष धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते नचिकेत बालकाश्रमातील मुलांना शालेय साहित्य, जीवनावश्यक वस्तू आणि खाऊवाटप करण्यात आले.

यावेळी धम्मराज साळवे म्हणाले, 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा देव तेथेचि जाणावा' या संत वाक्याप्रमाणे मदर तेरेसा यांनी आपले कार्य केले. कसलाही स्वार्थ न पाहता त्यांनी दिन-दुबळ्यांसाठी कार्य केले. त्या कार्याचा आदर करत सर्वांनी रंजल्या गांजल्यांसाठी कार्य करावे. विद्यार्थ्यांनी गरिबीची लाज न बाळगता जिद्दीने शिक्षण घ्यावे व देशाच्या भविष्यासाठी कार्य करावे. यांनतर आश्रमातील विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास रयत विद्यार्थी विचार मंच, मैत्री चळवळ, ध्यास ग्रुप यांनी सहकार्य केले.

My Pimpri
Page No. 07 Aug 29, 2017
Powered by: erelego.com

दिनांक २८ ऑगस्ट २०१७



186

R.P.A.D

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११ ०१८.
माध्यमिक शिक्षण विभाग
जा.क्र./माध्य/शि/१/कावि/८०७/१७
दिनांक : - २८/०८/२०१७

प्रति,
मा.धम्मराज साळवे, अध्यक्ष
रयत विद्यार्थी विचार मंच(महाराष्ट्र राज्य)

विषय – मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू माध्यमिक विद्यालय आकुर्डी येथील मुख्याध्यापक नियुक्ती संदर्भात.

महाशय,

उपरोक्त विषयांकित आपले दि.०९/०८/२०१७ रोजीचे पत्र प्राप्त झालेले आहे.सदर पत्रान्वये आपण माध्यमिक विद्यालय आकुर्डी येथे उर्दु माध्यमाचे मुख्याध्यापक यांची नियुक्ती करणेबाबत कळविलेले आहे.

जा.क्र. माध्य/१/कावि/७६७/२०१७, दि. ०७/०८/२०१७ अन्वये श्रीम.मोमीन रुक्साना सिराजउद्दीन यांची माध्यमिक विद्यालय आकुर्डी(उर्दु) यांची मुख्याध्यापक पदावर नियुक्ती केलेली आहे.

माहितीसाठी सादर.

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.
पिंपरी- १८

## दिनांक २८ ऑगस्ट २०१७

## उर्दू माध्यमिक विद्यालय आकुर्डी येथे येथे मुख्याध्यापक नियुक्त करणे

मौलाना अब्दुल कलाम आझाद उर्दू माध्यमिक विद्यालय आकुर्डी येथे येथे मुख्याध्यापक नियुक्त करणे संदर्भात निवेदन देण्यात आले होते यासंदर्भात शिक्षणाधिकारी यांच्याकडून अपेक्षित कार्यवाही करण्यात आली.







**दिनांक ५ सप्टेंबर २०१७**

**शिक्षक दिन**

खराळवाडी उर्दू शाळा येथे शिक्षक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख उपस्थितीत मा.धम्मराज साळवे संस्थापक अध्यक्ष रयत विद्यार्थी विचार मंच ,मा. शब्बीर भाई शेख पिंपरी चिंचवड एज्युकेशन सोसायटी ,गुलाम सर,मुख्याध्यापिका कांबळे मॅडम होते. यावेळी उपस्थित विद्यार्थांना मा.धम्मराज साळवे यांनी मार्गदर्शन केले व विद्यार्थांतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला



प्रभात

परिसरातून ७ जून २०१७ ते ७ डिसेंबर २०१८ पर्यंत तडीपार करण्यात आले आहे.

## भाऊराव पाटील यांची जयंती साजरी करावी

**पिंपरी –** विद्यार्थ्यांना दिलासा देणाऱ्या कमवा आणि शिका योजनेचे प्रवर्तक शिक्षणमहर्षी पद्मभूषण कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांच्या कार्याची दखल घेत, पिंपरी–चिंचवड महापालिकेने त्यांच्या विचारांना प्रेरक अशी जयंती साजरी करावी, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने करण्यात आली आहे. महापालिकेच्या वतीने महाविद्यालय स्तरावर निबंध, वक्तृत्व स्पर्धा ,विशेष मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करावेत. यामुळे शहराला त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळेल व कमवा आणि शिका या मंत्राला चालना मिळेल. या बाबींची दखल घेत कर्मवीर डॉ. भाऊराव पाटील यांची जयंती शहर स्तरावर साजरी करण्याची मागणी या निवेदनात केली आहे. या निवेदनावर संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, संतोष शिंदे, संदेश पिसाळ, अंजना गायकवाड, शशिकांत कुंभार, हर्षाली डावरे, आदिनाथ कांबळे, नीरज भालेराव, श्रद्धा कांबळे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दिनांक २० सप्टेंबर २०१७

कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने साजरी करण्यात यावी अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने करण्यात आली.




**दिनांक २२ सप्टेंबर २०१७**

**प्राचार्य डॉ.अशोक भोईटे सरांना पुष्पगुच्छ देउन त्यांचा सत्कार करण्यात आला.**

पिंपरी येथील रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालय येथील नव्याने प्राचार्य म्हणुन डॉ.अशोक भोईटे सरांची नियुक्ती झाली.आणि अगदी बघता बघता १ वर्षामध्ये अशोक भोईटे सरांनी महाविद्यालयाचा कायापालाट केला ,महाविद्यालयाच रंगकाम केल,विद्यार्थांना मुलभुत सुविधा पुरवल्या,व विद्यार्थांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याच काम केल. महाविद्यालयाचा हेवा वाटवा व प्रेरणा देणार महाविद्यालय अशी त्यांनी महाविद्यालयाची ओळख निर्माण केली. त्यांच्या याच कार्याची दखल घेत रयत_विद्यार्थी_विचार मंचाच्या वतीने आज प्राचार्य डॉ. अशोक भोईटे सरांना संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व सर्व पदाधिकार्यांच्या वतीने पुष्पगुच्छ देउन त्यांचा सत्कार करण्यात आला.

प्रभात 5/16



पिंपरी : डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन करताना रयत विद्यार्थी मंचचे पदाधिकारी.

## पिंपरीत रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

**पिंपरी –** पद्मश्री. डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३० व्या जयंतीनिमित्त पिंपरीतील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. कर्मवीरांच्या प्रतिमेला संस्थापक धम्मराज साळवे व खजिनदार शशिकांत कुंभार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्थापक धम्मराज साळवे म्हणाले, 'भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेमुळे व त्यांच्या कमवा व शिका या संकल्पनेमुळे ज्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत नव्हते, अशी मुले आज मोठ्या पदावर काम करत आहेत. भाऊरावांच्या रयत शिक्षण संस्थेचा आज वटवृक्ष झालेला आहे.' यावेळी संतोष शिंदे, संदेश पिसाळ, नीरज भालेराव, आदिनाथ कांबळे, रोहित कांबळे, भूषण चौधरी आदी उपस्थित होते.

पुढारी



रयत विद्यार्थी विचारमंचच्या वतीने पद्मश्री डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३० व्या जयंतीनिमित्त कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन करण्यात आले.

## कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

**पिंपरी : प्रतिनिधी**

रयत विद्यार्थी विचारमंचच्या वतीने पद्मश्री डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३० व्या जयंतीनिमित्त कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन करण्यात आले. पिंपरी येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले महाविद्यालयात ही जयंती साजरी करण्यात आली. कर्मवीरांच्या प्रतिमेला संस्थापक-अध्यक्ष धम्मराज साळवे व खजिनदार शशिकांत कुंभार यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या वेळी संस्थापक धम्मराज साळवे म्हणाले की, भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेमुळे व त्यांच्या कमवा व शिका या संकल्पनेमुळे ज्या विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत नव्हते, त्यांना शिक्षण घेता आले. भाऊरावांनी मागास व गरीब मुलांना शिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून त्यांनी रयत शिक्षण संस्था स्थापन केली. ते जोतिबा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे एक महत्त्वाचे सदस्य होते. त्यांचा भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही सहभाग होता. भाऊरावांनी कमवा व शिका ही संकल्पना राबवून गरीब विद्यार्थ्यांना रोजगार व शिक्षण उपलब्ध करून दिले. अस्पृश्यतेबद्दल त्यांना चीड होती.

या वेळी रयत शिक्षण संस्थेचे महात्मा फुले महाविद्यालयाचे नव्याने रुजू झालेले प्राचार्य डॉ. अशोक भोईटे यांनी अवघ्या दोन वर्षांत महात्मा फुले महाविद्यालयाचा हेवा वाटावा व प्रेरणा घ्यावी, अशी महाविद्यालयाची नवीन ओळख निर्माण केली. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण करण्याचे काम केले. त्यांच्या याच कार्याची दाखल घेत रयत विद्यार्थी विचारमंचाने संस्थापक धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे व सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी संदेश पिसाळ, नीरज भालेराव, आदिनाथ कांबळे, रोहित कांबळे, भूषण चौधरी आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

My Pimpri
Page No. 06 Sep 23, 2017
Powered by: erelego.com

# कर्मवीर भाऊराव पाटिल को अभिवादन

**पिंपरी,** रयत शिक्षण संस्था के माध्यम से गरीब तबकों के बच्चों के लिए शिक्षा के किवाड़ खोलनेवाले पद्मश्री कर्मवीर डॉ. भाऊराव पाटिल की 130वीं जयंती के उपलक्ष्य में उन्हें व उनके कामों को याद किया गया। पुणे और पिंपरी चिंचवड़ शहर की विभिन्न शिक्षा संस्था, सामाजिक संस्था की ओर से उनकी प्रतिमा को पुष्पमाला अर्पित कर भावभीनी श्रद्धंजलि अर्पित की गई।

रयत विद्यार्थी मंच की ओर से अध्यक्ष धम्मराज सालवे और कोषाध्यक्ष शशिकांत कुंभार ने डॉ. कर्मवीर भाऊराव पाटिल की फोटो को पुष्पमाला अर्पित की। इस अवसर पर महासचिव संतोष शिंदे, संदेश पिसाल, नीरज भालेराव, आदिनाथ कांबल, रोहित कांबले और भूषण चौधरी उपस्थित थे। धम्मराज सालवे ने कहा कि, कर्मवीर भाऊराव पाटिल ने दलित




और गरीब विद्यार्थियों के लिए रयत शिक्षा संस्था की स्थापना की थी। महात्मा फुले ने स्थापन किए सत्यसोधक समाज का वे सदस्य थे। आजादी के आंदोलन में भी वे शामिल थे। उन्होंने अपने स्कूल-कॉलेजों में अर्न एंड लर्न योजना शुरू कर गरीब विद्यार्थियों के लिए रोजगार और शिक्षा उपलब्ध की। शाहू महाराज के विचारों का प्रभाव उन पर था। पुणे विश्वविद्यालय ने भी 1951 में डी. लिट. दी थी। कर्मचारी भाऊराव पाटिल के कारण आज कई गरीब विद्यार्थियों को शिक्षा मिली है।

राष्ट्रवादी विद्यार्थी कांग्रेस के महात्मा फुले शाखा की ओर से महेश आल्हाट ने कर्मवीर भाऊराव पाटिल की प्रतिमा पर पुष्पहार अर्पण किया। इस अवसर पर अखिलेश जगदाले, विवेक भालेराव, अक्षय गभाले, विशाल कांबले, वैभव वाघ, अनिकेत ठोंबरे, राजवर्धन नाथभजन, विक्रम कांबले उपस्थित थे। महात्मा फुले विद्यालय के मैदान में आयोजित कार्यक्रम में आल्हाट ने कहा कि ,गरीब विद्यार्थियों के लिए भाऊराव पाटिल द्वारा शुरु की गई रयत शिक्षा संस्था के माध्यम से हजारों विद्यार्थियों को शिक्षा मिली है। थेरगांव में राणुबाई नागुभाऊ बारणे प्रशाला एवं माध्यमिक विद्यालय की ओर से उनकी प्रतिमा को पुष्पमाला अर्पित की गई। इस अवसर पर स्कूल के शिक्षक और विद्यार्थी बड़ी संख्या में उपस्थित थे। शिक्षकों ने विद्यार्थियों को डॉ. भाऊराव पाटिल के कार्यों की जानकारी विद्यार्थियों को दी।

दिनांक २२ सप्टेंबर २०१७

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३० व्या जयंतीनिमित्त

रयत विद्यार्थी विचार मंच्याच्या वतीने अभिवादन करण्यात आले



**दिनांक २५ सप्टेंबर २०१७**

**कु.प्रतीक्षा परहर या खेळाडूचा सन्मान**

कु.प्रतीक्षा परहर या खेळाडू विद्यार्थिनीने आतंरराष्ट्रीय स्तरांवर बेल्ट रेसीलिंग स्पर्धेत भारताची शान वाढवत ब्राँझ पदक मिळवल्या बद्दल रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने तिचा सन्मान व्हावा या करिता पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त व क्रीडा सभापती यांना निवेदन देण्यात आले.



पिंपरी-चिंचवड

निवडक

पिंपरी : प्रतीक्षा परहरला आर्थिक मदत करण्याच्या मागणीचे निवेदन क्रीडा समिती सभापती लक्ष्मण सस्ते यांना देताना धम्मराज साळवे.

### प्रतीक्षा परहर हिला मदतीची मागणी

**पिंपरी, दि. १ (प्रतिनिधी) -** गांधीनगरमधील प्रतीक्षा चंद्रकांत परहर हिने तुर्कमेनिस्तानातील अशगाबत येथे झालेल्या इंडियन ऑलम्पिक कॉन्टीजेन्ट व्हीटाईन पाचव्या इनडोअर अॅण्ड मॅट्रीयल आर्टस् गेम २०१७ मध्ये बेल्ट रेसलिंग स्पर्धेत ब्राँझ पदक मिळवले. तिच्या या यशाची दखल घेऊन प्रोत्साहनासाठी महापालिकेने तिला आर्थिक मदत करावी, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचने केली. क्रीडा समिती सभापती लक्ष्मण सस्ते यांना या मागणीचे निवेदन दिले आहे. प्रतिक्षा ही गांधीनगर येथील रहिवासी असून तिच्या घरची आर्थिक स्थिती हालाखीची आहे. तिच्या पालकांनी दीड लाखांचे कर्ज काढून स्पर्धेत सहभागी होण्यासाठी परदेशात पाठवले. या स्पर्धेत तिने ब्राँझ पदक मिळवले. महापालिकेच्या वतीने दत्तक खेळाडू योजना राबवली जाते. तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना आर्थिक मदतही केली जाते. प्रतिकूल परिस्थितीमध्ये प्रतीक्षाने मिळविलेले यश इतरांना प्रेरणादायी आहे. ही बाब लक्षात घेऊन, पिंपरी-चिंचवड महापालिकेने तिचा व तिच्या कुटुंबाचा सन्मान पूर्वक सत्कार करून तिला भरीव अशी आर्थिक मदत करावी. यामुळे तिला प्रेरणा मिळून ती आणखी उत्साहाने चांगली कामगिरी करू शकेल, असे या निवेदनात नमूद केले आहे. प्रतीक्षाच्या यशाची दखल घेऊन विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक-अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या हस्ते तिचा पुष्पगुछ देऊन सत्कार केला. यावेळी रयत विद्यार्थी विचार मंचचे खजिनदार शशिकांत कुंभार, महासचिव संतोष शिंदे, संदेश पिसाळ, नीरज भालेराव, आदिनाथ कांबळे, अंजना गायकवाड, श्रद्धा कांबळे आदी उपस्थित होते.

**दिनांक २६ सप्टेंबर २०१७**

**कु.प्रतीक्षा परहर या खेळाडूचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने सन्मान व्हावा**

कु.प्रतीक्षा परहर या खेळाडू विद्यार्थिनीने आतंरराष्ट्रीय स्तरांवर बेल्ट रेसीलिंग स्पर्धेत भारताची शान वाढवत ब्राँझ पदक मिळवल्या बद्दल पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने तिचा सन्मान व्हावा या करिता पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त व क्रीडा सभापती यांना निवेदन देण्यात आले.





## दिनांक २८ सप्टेंबर २०१७
## कर्मवीर भाऊराव पाटील जयंती

महात्मा फुले महाविद्यालयात पिंपरी येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे व पदाधिकारी सदस्यांनी रक्तदान केले.

**रयत विद्यार्थी विचार मंच**

रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी अध्यक्ष धम्मराज साळवे व उपाध्यक्ष संदेश पिसाळ यांच्या हस्ते महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमांस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

धम्मराज साळवे म्हणाले की, आज देशातील वाढती गुन्हेगारी पाहता असे वाटत की, आपण गांधीजींच्या विचारांचे मारेकरी होत आहोत; पण गांधीजी हे सत्य, अहिंसावादी होते. प्रत्येक विद्यार्थ्याने व व्यक्तींनी त्यांच्या तत्त्वांचे अनुकरण केले पाहिजे. लालबहादूर शास्त्री यांच्याबद्दल महासचिव संतोष शिंदे म्हणाले, शास्त्रीजींना शेतकरी व जवानांबद्दल मोठा आदर होता. ते जवानांबद्दल म्हणत, देशाचे रक्षण करणे हे केवळ सैनिकांचे काम नाही, तर ते प्रत्येक भारतीयाचे काम आहे. यातून त्यांचे देशप्रेम दिसून येते. ते राजकीय व स्वातंत्र्यसेनानी असले, तरी ते पुस्तकप्रेमी होते.

# महात्मा गांधी, लालबहादूर शास्त्रींना अभिवादन

**पिंपरी :** रयत विद्यार्थी विचारमंचाच्या वतीने महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी संस्थापक-अध्यक्ष धम्मराज साळवे व उपाध्यक्ष संदेश पिसाळ यांच्या हस्ते महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर साळवे, पिसाळ व महासचिव संतोष शिंदे यांनी गांधी व शास्त्री यांच्या कार्याचा आढावा घेतला.

**दिनांक ३ ऑक्टोबर २०१७**

**दैनिक पुढारी व पुण्यनगरी**

महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांना अभिवादन करण्यात आले.

पुढारी

# संविधानाची कोनशिलात बसवलेली प्रत दुरुस्त करावी

**रयत विद्यार्थी विचार मंचची मागणी**

## आंबेडकर उद्यानातील संविधानाच्या प्रास्ताविकातील अक्षरे पुसली

**पिंपरी : प्रतिनिधी**

पिंपरीतील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानातील कोनशिलेत बसवलेल्या प्रास्ताविकेतील अनेक अक्षरे पुसली गेल्यामुळे भारतीय संविधानाचा अपमान होत आहे. लवकरात लवकर भारतीय संविधानाची प्रत कोरीवकाम करून नव्याने दुरुस्त करावी, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडे केली आहे.

याबाबत दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महापालिकेने डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानातील कोनशिलेत भारतीय संविधानाची प्रत उभारली आहे.

या उद्यानातील सर्वांत विशेष आकर्षण म्हणजे भारतीय संविधानाची प्रास्ताविका आहे; परंतु पालिकेच्या या उद्यानाकडे दुर्लक्ष होत असल्याने कोनशिलेत बसवलेल्या प्रास्ताविकेतील अनेक अक्षरे पुसली गेली आहेत. या उद्यानात अनेक कार्यक्रम होतात. पिंपरी चौकातील विशेष आकर्षण असलेल्या उद्यानाला रोज अनेक नागरिक भेट देतात; मात्र नागरिक भारतीय संविधानाच्या प्रतीवरील पुसलेली अक्षरे पाहतात तेव्हा पालिकेबद्दल नाराजी व्यक्त करतात. नागरिकांच्या भावनांचा विचार करून लवकरात लवकर भारतीय संविधानाची प्रत कोरीवकाम करून नव्याने दुरुस्त करावी; जेणे करून अक्षरे परत पुसली जाणार नाहीत, याची काळजी घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

My Pimpri
Page No. 03 Oct 05, 2017
Powered by: erelego.com

**दिनांक ०५ ऑक्टोबर २०१७**


**पिंपरी येथील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ऊद्यानातील भारतीय संविधानाची कोनशीलेत बसवलेल्या प्रस्ताविके च्या दुरवस्था बाबत निवेदन**

पिंपरी येथील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ऊद्यानातील भारतीय संविधानाची कोनशीलेत बसवलेल्या प्रस्ताविकेची दुरवस्था झाली होती.यासाठी दिनांक ०४ ऑक्टोबर २०१७ रोजी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने यासंदर्भात पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त यांना निवेदन देण्यात आले होते .



रयत मंचच्या मागणीनंतर प्रास्ताविकेचे काम सुरु

संविधान प्रस्ताविकेचे काम पुर्ण



**दिनांक ०७ ऑक्टोबर २०१७**

**भारतीय संविधानाची कोनशीलेत बसवलेल्या प्रस्ताविके चे काम पुर्णत्वास**

पिंपरी येथील विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ऊद्यानातील भारतीय संविधानाची कोनशीलेत बसवलेल्या प्रस्ताविकेची दुरवस्था झाली होती.यासाठी दिनांक 0४ ऑक्टोबर २०१७ रोजी रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने यासंदर्भात पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त यांना निवेदन देण्यात आले आणि हे काम पुर्णत्वास आले.रयत विद्यार्थी विचार मंचच्या मागणीची दखल घेऊन काम पुर्ण केल्याबद्दल महापालिकेचे आभार.

प्रभात 7/18



पिंपरी : किशोर डांगे यांचा मैत्री चळवळ आणि योद्धा सोशल फाउंडेशन यांच्या वतीने भारतीय संविधान प्रास्ताविकेची प्रत देऊन सत्कार करण्यात आला.

## आंतरराष्ट्रीय स्तरावरील शरीरसौष्ठवपटू किशोर डांगे यांचा पिंपरीत सत्कार

**पिंपरी, दि.७ (प्रतिनिधी)-** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील शरीरसौष्ठव स्पर्धेत अनेक पदके मिळविणारे पोलीस दलातील कर्मचारी किशोर डांगे यांचा मैत्री चळवळ आणि योद्धा सोशल फाउंडेशन यांच्या वतीने भारतीय संविधान प्रास्ताविकेची प्रत देऊन सत्कार करण्यात आला. पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा उद्यानात हा कार्यक्रम पार पडला. सुरुवातीला किशोर डांगे यांच्या हस्ते महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थितांनी मनोगत व्यक्त करताना डांगे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच राज्य सरकारने त्यांची पोलिस उपअधिक्षक पदावर नियुक्ती करावी, यासंदर्भात सर्व पक्ष, संघटना यांच्या वतीने जिल्हाधिकारी याना निवेदन देऊन पाठपुरावा करू असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाला योद्धा सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष साकीभाऊ गायकवाड, पोलीस नाईक राजेंद्र बारशिंगे, संदीप पिसाळ, रयत विद्यार्थी विचार मंचचे धम्मराज साळवे, निलेश निकाळजे, अनिता सावळे, रवींद्र सावळे, प्रमोद सुर्यवंशी, धुराजी शिंदे, वैजीनाथ सोनटके, संदीप साळवे, विजय गायकवाड, निलेश अंकुशराव, सुनील ढसाळ, दुर्गप्पा देवकर, सिद्धिक शेख, राजेश रॉय, संदेश पिसाळ, विनोद भिसे, स्वप्नील जावळे, संगीता शहा, सुधीर दुधमल, लकी नागटिळक, संकल्प गोळे आदी उपस्थित होते.

दिनांक ८ ऑक्टोबर २०१७ दैनिक प्रभात

आंतरराष्ट्रीय शरीरसौष्टवपटू किशोर डांगे यांचा सन्मान

रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या व मैत्री चळवळ,योद्धा सोशल फौंडेशन व अन्य सामाजिक संघटनांच्या वतीने आंतरराष्ट्रीय शरीरसौष्टवपटू किशोर डांगे यांचा भारतीय संविधानाची प्रत देऊन सन्मान करण्यात आला.

पुढारी

# शैक्षणिक बाजारीकरण थांबवावे

## रयत विद्यार्थी मंचाची मागणी

**पिंपरी : प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील खासगी क्लासेसना आळा घालून महापालिकांतर्गत नियम अटी लागू करून परवाने देऊन क्लासेसला मान्यता द्यावी. जे क्लासेस स्वार्थापोटी चालवले जात आहेत व विद्यार्थ्यांची शैक्षणिक दिवाळखोरी करत आहेत त्यांच्यावर कारवाई करून शैक्षणिक बाजारीकरण थांबवावे, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचतर्फे करण्यात आली आहे.

याबाबत संघटनेचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे, पिंपरी-चिंचवड शहर हे सृजनशील नागरिकांचे शहर आहे. या शहरातून गुणवंत विद्यार्थी स्पर्धेच्या युगात तयार व्हावेत, अशी भावना आहे; मात्र शहराचा जसा विकास होत आहे त्याच प्रमाणात शिक्षणाचे बाजारीकरण होत आहे. आर्थिक फायदा मिळवण्यासाठी अनेकजण कोणत्याही प्रकारची शैक्षणिक पदवी न घेता स्वतःला प्राध्यापक म्हणून मिरवत असून, कोचिंग क्लासेस सुरू करून सामान्य जनतेची पिळवणूक करत आहेत.

शालेय शिक्षण घेणारे विद्यार्थी शाळेत अभ्यास न करता क्लासेसवर अवलंबून राहत आहेत. काही शालेय शिक्षक शाळेत जास्त न शिकवता स्वतःच्या आर्थिक स्वार्थासाठी विद्यार्थ्यांना क्लासेसला बोलावून पैसे उकळण्याचा धंदा करतात. यामुळे शैक्षणिक दर्जा खालावत आहे. त्यामुळे विद्यार्थी भविष्यातील संकटांना सामोरे जाऊ शकणार नाहीत, विद्यार्थी स्पर्धेच्या युगात टिकू शकणार नाहीत. विद्यार्थी हे या देशाचे उज्ज्वल भविष्य आहे. ते जर योग्य रीतीने घडले नाही, तर देशाचे खूप नुकसान होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

आयुक्तांनी यामध्ये लक्ष घालून शैक्षणिक बाजारीकरण थांबविणे गरजेचे आहे. खासगी क्लासेसवर आळा बसवून महापालिकांतर्गत नियम-अटी लागू करून परवाने देऊन क्लासेसला मान्यता द्यावी व विद्यार्थ्यांची शैक्षणिक दिवाळखोरी करत आहेत त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

My Pimpri
Page No. 03 Oct 10, 2017
Powered by: erelego.com

## 'कोचिंग क्लासेस'वर निर्बंध घालावेत

**पिंपरी –** शहरात अनेकांनी कोणत्याही प्रकारची शैक्षणिक पदवी न घेता 'कोचिंग क्लासेस' सुरु करून सामान्य जनतेची पिळवणूक करत आहेत, त्यांना आळा घालण्याची मागणी रयत विद्यार्थी मंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी केली आहे. याबाबत आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काही शालेय शिक्षक शाळेत जास्त न शिकवता आर्थिक स्वार्थासाठी विद्यार्थ्यांना क्लासेसला बोलावून कष्टाचे पैसे उकळत आहे. हे बाजारीकरण रोखावे यासाठी अशा क्लासेसवर निर्बंध घालण्याची मागणी केली आहे.

**दैनिक १० ऑक्टोबर २०१७**

**पिंपरी चिंचवड शहरातील शिक्षणाचे बाजारीकरण थांबवण्या संदर्भात** रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले होते त्याची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल



रयत विद्यार्थी मंचचे कलाम यांना अभिवादन

पिंपरी : रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने दिवंगत माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला मंचचे संस्थापक अध्यक्ष व सचिव नीरज भालेराव यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष साळवे म्हणाले कि, तरुणांनी व विद्यार्थ्यांनी अब्दुल कलाम यांचा आदर्श घेऊन त्यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन अंगिकारला तर देश जगात महासत्ता बनल्याशिवाय राहणार नाही. संतोष शिंदे, अंजना गायकवाड, संदेश पिसाळ, शशिकांत कुंभार, नीरज भालेराव, आदिनाथ कांबळे, आनंद विजापूरे आदी उपस्थित होते.

दिनांक १७ ऑक्टोबर २०१७ दैनिक लोकमत

डॉ.ए. पी. जे. अब्दुल कलाम याना जयंतीनिम्मित रयत विद्यार्थी विचार मंचाचे अभिवादन.




# पिंपरीतील ज्योतिबा फुले उद्यानाची दुरवस्था

**पिंपरी, दि. १८ (प्रतिनिधी)** - पालिकेच्या दुर्लक्षामुळे ज्योतिबा फुले उद्यानाची दुरवस्था झाली असून परिसरात अस्वच्छता पसरली आहे. त्यामुळे नागरिकांना या उद्यानात फिरायला जाण्याची इच्छा होत नसल्याची भावना व्यक्त होत आहे. उद्यानाची दुरुस्ती करून नागरिकांच्या सोयीसाठी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने केली आहे.

रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने आयुक्त श्रावण हर्डीकर यांना या संदर्भात निवेदन देण्यात आले आहे. निवेदनात म्हटले आहे की, बहुजनांना शिक्षणाची दारे खुली करून देणारे ज्योतिबा फुले यांनी संपूर्ण आयुष्य गोरगरिबांना शिक्षण देण्यात घालवले. त्यांचा आदर्श नव्या पिढीला देण्यासाठी महापालिकेने महात्मा फुले यांच्या नावाने उद्यान तयार केले. उद्यानात फुलेंचा पुतळा आहे. परंतु, या पुतळ्याची स्वच्छता वेळेवर होत नाही. पुतळा परिसरात तसेच उद्यानात अस्वच्छता आहे. काही ठिकाणी दुरुस्तीची गरज भासत असताना देखील अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत आहेत.

उद्यानात गवत वाढले आहे, परिसरात दुर्गंधी पसरलेली आहे. दैनंदिन साफसफाई होत नाही. पिण्याच्या पाण्याची सोय नाही, एखादा सांस्कृतिक अथवा धार्मिक कार्यक्रम घेण्याची सुविधा नाही, त्यामुळे परिसरातील नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. नवेदन देताना संस्थापक धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, अंजना गायकवाड, संदेश पिसाळ, नीरज भालेराव शशिकांत कुंभार, आदिनाथ कांबळे आदी उपस्थित होते



## फुले उद्यानाची दुरुस्ती करण्याची मागणी

पिंपरी : राष्ट्रपिता जोतिबा फुले उद्यानाकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून, उद्यानाची वेळच्या वेळी देखभाल, दुरुस्ती करण्याची मागणी रयत विद्यार्थी विचार मंचाने महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडे निवेदन देण्यात आले. उद्यान विभाग दुर्गा टेकडी, बर्ड व्हॅली यांसारखी उद्याने सर्व सोयींनी सुसज्ज ठेवतो. कारण त्यातून आर्थिक फायदा होतो. पण, उद्यान व स्मारकांकडे नेहमी दुर्लक्ष होते. दुरुस्ती, साफसफाई करून घ्यावी, असे निवेदनात म्हटले आहे. निवेदन देताना संस्थापक धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, अंजना गायकवाड, संदेश पिसाळ,नीरज भालेराव शशिकांत कुंभार, आदिनाथ कांबळे उपस्थित होते .

दिनांक १९ ऑक्टोबर २०१७

पिंपरी येथील महात्मा जोतिबा फुले यांच्या उद्यानाची झालेली दुरावस्थेबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना निवेदन

**लोकमत**

## ग्रंथालयात बदल न करण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी** : गांधीनगर येथील महात्मा फुले पुतळ्याशेजारील कामगार भवनातील नियोजित सावित्रीबाई फुले मध्यवर्ती ग्रंथालयात कसलाही बदल करु नये, अशी मागणी रयत विद्यार्थी विचार मंचाने आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडे केली आहे.

मागील सत्ताधाऱ्यांनी ग्रंथालय सुरु करण्याचा ठराव केला होता. मात्र, त्या ठिकाणी शिक्षण विभाग आकाशचिन्ह परवाना आणि कायदा विभागाचे कार्यालय स्थलांतर करण्यात येणार असल्याने मध्यवर्ती ग्रंथालयांची संकल्पना रद्द होत असल्याचे दिसत आहे. यामुळे वाचन प्रेमी, विद्यार्थी आणि नागरिक यांच्यामध्ये असंतोष आहे. कसलाही बदल न करता आराखड्यानुसार ग्रंथालयाचे त्वरित उदघाटन करावे, असे निवेदनात म्हटले आहे.

- विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यास सोईचे व मध्यवर्ती ठिकाण निर्माण होणाऱ्या ग्रंथालयात इतर शासकीय कार्यासाठी बदल करु नये, असे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, कार्याध्यक्षा अंजना गायकवाड, उपाध्यक्ष संदेश पिसाळ, शशिकांत कुंभार, हर्षाली डावरे, आदिनाथ कांबळे, नीरज भालेराव, श्रद्धा कांबळे यांनी निवेदनात म्हटले आहे.

Hello Pimpri Chinchwad
Page No. 5 Oct 24, 2017
Powered by: erelego.com

**जनशक्ति**

## महापालिकेला साकडे

**पिंपरी-चिंचवड** । गांधीनगरातील महात्मा फुले पुतळ्याशेजारील इमारतीत उभारण्यात येणारे सावित्रीबाई फुले मध्यवर्ती ग्रंथालय रद्द करण्याचा हालचाली महापालिका प्रशासनाकडून सुरू आहेत. या ग्रंथालयाच्या जागेत महापालिकेतील आकाशचिन्ह परवाना आणि कायदा विभागाचे स्थलांतर होणार असल्याची चर्चा आहे. मात्र, महापालिकेने हे ग्रंथालय रद्द करू नये, या मागणीचे निवेदन नुकतेच महापालिका आयुक्तांना रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे देण्यात आले आहे. या ग्रंथालयात स्पर्धा परीक्षा केंद्रही उभारले जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना चांगले व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. परंतु, ग्रंथालय रद्द केले तर विद्यार्थ्यांचे नुकसान होईल. तसेच, वाचन संस्कृतीवर घाला येईल. या बाबींचा विचार करून महापालिका प्रशासनाने हे ग्रंथालय रद्द करू नये, ते आहे; त्याच जागेवर स्थापन करावे, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

पुढारी

# सावित्रीबाई वाचनालयाची प्रस्तावित जागा बदलू नये

## रयत विद्यार्थी मंचची मागणी

**पिंपरी : प्रतिनिधी**

गांधीनगर येथील महात्मा फुले पुतळ्याशेजारील इमारतीमध्ये सावित्रीबाई फुले मध्यवर्ती ग्रंथालय उभारण्याचा ठराव मागील सत्ताधारी पक्षाने केला होता; मात्र या ठिकाणी महापालिकेचे इतर विभाग स्थलांतर होणार आहेत, त्यामुळे ग्रंथालयाची संकल्पना रद्द होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या ठिकाणच्या प्रस्तावित वाचनालयात बदल करू नये, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचच्या वतीने प्रसिद्धीपत्रकाद्वारे करण्यात आली.

या ठिकाणी ग्रंथालय सुरू झाल्यामुळे शहरातील नागरिक आणि विद्यार्थ्यांना वाचनासाठी पुस्तके येथे उपलब्ध करून देण्यात येणार होती; तसेच स्पर्धा परीक्षेचे केंद्रही तयार केले जाणार होते. शहरातील नागरिकांमध्ये व विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. कारण वाचनाची आवड जोपासण्यासाठी व अभ्यास करण्यासाठी मध्यवर्ती ठिकाण झाले होते; मात्र त्या ठिकाणी शिक्षण विभाग आकाशचिन्ह परवाना आणि कायदा विभागाचे कार्यालय स्थलांतरीत करण्यात येणार आहे, यामुळे वाचनप्रेमी नाराज झाले आहेत.

शहराच्या नावलौकिकात भर पडणारे ग्रंथालय शहरासाठी अत्यंत गरजेचे आहे. वाचनाच्या प्रेरणेने नागरिकांमध्ये अभ्यासू वृत्ती वाढीस लागणार आहे. विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यास सोयीचे व मध्यवर्ती असणारे ठिकाण इतर शासकीय कार्यालयांसाठी बदलू नये.

आपल्या या निर्णयामुळे नागरिकांच्या मनात फसवणुकीची भावना निर्माण होईल याची दखल घ्यावी. महापालिकेने नियोजित वाचनालयात कसलाही बदल न करता, आराखड्यानुसार सावित्रीबाई फुले वाचनालयाचे त्वरित उद्घाटन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भातील प्रसिद्धीपत्रकावर धम्मराज साळवे, संतोष शिंदे, संदेश पिसाळ, अंजना गायकवाड, शशिकांत कुंभार, हर्षाली डावरे आदींच्या सह्या आहेत.

My Pimpri
Page No. 03 Oct 24, 2017
Powered by: erelego.com



प्रभात

# सावित्रीबाई फुले मध्यवर्ती ग्रंथालयाच्या रचनेत फेरबदल करण्यास विरोध

**पिंपरी–** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मध्यवर्ती ग्रंथालयाच्या रचनेत फेरबदल करण्यास रयत विद्यार्थी मंचने विरोध केला आहे. मंचचे संस्थापक धम्मराज साळवे यांनी यासंदर्भात महापालिका आयुक्त श्रावण हर्डीकर यांना निवेदन दिले आहे. त्यांनी त्यात म्हटले आहे की, गांधीनगर येथील महात्मा फुले पुतळ्याशेजारील इमारतीमध्ये सावित्रीबाई फुले मध्यवर्ती ग्रंथालय उभारण्याचा ठराव मागील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसने केला होता. स्पर्धा परीक्षेचे केंद्रही येथे तयार केले जाणार होते. मात्र, त्या ठिकाणी शिक्षण विभाग आकाशचिन्ह परवाना आणि कायदा विभागाचे कार्यालय स्थलांतर करण्यात येणार आहे. त्यासाठी मध्यवर्ती ग्रंथालय रद्द करण्याच्या हलचाली सुरु असून यामुळे वाचकप्रेमी, विद्यार्थी वर्गामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. शहराच्या नावलौकिकात भर पडणाऱ्या ग्रंथालयाची शहराला अत्यंत गरज आहे.त्यामुळे ग्रंथालयाच्या रचनेत कोणताही फेरबदल करु नये, अशी मागणी धम्मराज साळवे यांच्यासह मंचचे महासचिव संतोष शिंदे, उपाध्यक्ष संदेश पिसाळ, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड आदींनी केली आहे.

दिनांक २४ ऑक्टोबर २०१७

सावित्रीबाई फुले मध्यवर्ती ग्रंथालयाच्या फेररचनेत बदल करण्यास विरोध.

वृत्तपत्रांनी घेतलेली दखल

**पुढारी**

## संक्षिप्त



**रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने पिंपरी येथील डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.**

## विद्यार्थी दिनाचे सर्वत्र स्वागत

**पिंपरी :** रयत विद्यार्थी मंचतर्फे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळेचा पहिला दिवस ७ नोव्हेंबर हा विद्यार्थी दिन म्हणून घोषित केल्याबद्दल शासनाचे आभार मानण्यात आले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना लहानपणापासूनच अनेक अडचणींचा सामना करावा लागला. त्यावर त्यांनी मात करीत आपल्या बुद्धिमत्तेचा ठसा जगभरात उमटविला. आजचा विद्यार्थी हा देशाचे भविष्य असून, ते उज्ज्वल करण्यासाठी आदर्श विद्यार्थी निर्माण होणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर आंबेडकरांनी शिक्षणासाठी घेतलेल्या कठोर परिश्रमांची जाणीव आजच्या विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने ७ नोव्हेंबर हा दिवस राज्यात यापुढे विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. याचेच औचित्य साधून रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने पिंपरीतील बाबासाहेबांच्या पुतळ्यास संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व संघटक आदिनाथ कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी मिठाई वाटून आनंद व्यक्त केला.

# विद्यार्थी मंचाच्या वतीने शासनाचे अभिनंदन

**पिंपरी दि. २९ प्रतिनिधी -** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि शोषित वंचितांचे उद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळेचा पाहिला दिवस म्हणजे ७ नोव्हेंबर १९०० हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून घोषित करण्यात आला आहे.

आंबेडकरांनी शिक्षणासाठी घेतलेल्या कठोर परिश्रमांची जाणीव आजच्या विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी हा दिन महत्वाचा ठरणार आहे. त्यामुळे रयत विद्यार्थी मंचाच्यावतीने शासनाचे अभिनंदन करण्यात आले आहे. याचेच औचित्य साधून रयत विद्यार्थी विचार मंचाच्यावतीने पिंपरी येथील बाबासाहेबांच्या पुतळ्यास संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व संघटक आदिनाथ कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी एकमेकांना मिठाई भरून आनंद व्यक्त केला.



# 'बाबासाहेबांचा विद्याव्यासंग विद्यार्थ्यांमध्ये रुजावा'

**पिंपरी : प्रतिनिधी**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळेचा पाहिला दिवस म्हणजे ७ नोव्हेंबर १९००. या दिवसापासून यांनी आपला विद्याव्यासंग अखेरपर्यंत जपला. हा व्यासंग आजच्या विद्यार्थ्यांमध्ये रुजावा व भविष्यात आदर्श विद्यार्थी निर्माण व्हावेत, असे प्रतिपादन रयत विद्यार्थी विचारमंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी केले.

डॉ. आंबेडकर यांनी शिक्षणासाठी घेतलेल्या कठोर परिश्रमांची जाणीव विद्यार्थ्यांना व्हावी, या उद्देशाने दि. ७ नोव्हेंबर हा दिवस विद्यार्थिदिन साजरा करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. याचे औचित्य साधून रयत विद्यार्थी विचारमंचाच्या वतीने पिंपरी येथील बाबासाहेबांच्या पुतळ्यास साळवे व संघटक आदिनाथ कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला; त्या वेळी ते बोलत होते. या वेळी पदाधिकाऱ्यांनी एकमेकांना मिठाई भरून आनंद व्यक्त केला. या वेळी अंजना गायकवाड, श्रद्धा कांबळे, संतोष शिंदे, आदिनाथ कांबळे, शशिकांत कुंभार, नीरज भालेराव, संदेश पिसाळ, अनिल भंडारी, सागर भालेराव, आनंद विजापुरे आदी उपस्थित होते.

**दिनांक ३१ ऑक्टोबर २०१७**

**बाबासाहेबांचा शाळा प्रवेश दिन**

दिनांक ७ नोव्हेंबर बाबासाहेबांचा शाळा प्रवेश दिन हा दिवस राज्यशासनाने विद्यार्थी दिन म्हणून जाहीर केल्यानंतर रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेच्या वतीने आनंदोत्सव साजरा करण्यात आला.त्याची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल

पुढारी

## नरेंद्र दाभोलकर यांना अभिवादन

**पिंपरी : प्रतिनिधी**

रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे नरेंद्र दाभोलकर यांच्या जयंतीनिमित्त संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व कार्याध्यक्षा अंजना गायकवाड यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महासचिव संतोष शिंदे, उपाध्यक्ष संदेश पिसाळ, खजिनदार शशिकांत कुंभार, संघटक आदिनाथ कांबळे, सचिव नीराज भालेराव, अनिल भंडारी, आनंद विजापुरे आदी उपस्थित होते

यावेळी साळवे म्हणाले, नरेंद्र दाभोलकर यांना खरी श्रद्धांजली द्यायची असेल, तर आजच्या युवकांनी नरेंद्र दाभोलकर यांचा आदर्श घेऊन अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम केले पाहिजे.

My Pimpri
Page No. 04 Nov 02, 2017
Powered by: erelego.com

## डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना अभिवादन

**पिंपरी : प्रतिनिधी**

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व कार्याध्यक्षा अंजना गायकवाड यांच्या हस्ते डॉ. दाभोलकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी संतोष शिंदे, संदेश पिसाळ, शशिकांत कुंभार, आदिनाथ कांबळे, नीराज भालेराव, अनिल भंडारी, आनंद विजापूरे आदी उपस्थित होते.

## डॉ. दाभोलकर यांना अभिवादन

**पिंपरी–** डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या जयंतीनिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. रयत विद्यार्थी विचार मंचचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व कार्याध्यक्षा अंजना गायकवाड यांनी यावेळी दाभोलकरांच्या ऐतिहासिक कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. साळवे म्हणाले की, दाभोलकरांना खरी श्रद्धांजली वाहायची असेल तर युवकांनी त्यांचा आदर्श घेऊन अंधश्रद्धा निर्मूलनासाठी काम केले पाहिजे. समाजातील चुकीच्या गोष्टींच्या विरोधात उभे राहिले पाहिजे. कारण, देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीस अंधश्रद्धा सर्वात मोठी कीड आहे. यावेळी महासचिव संतोष शिंदे, उपाध्यक्ष संदेश पिसाळ, खजिनदार शशिकांत कुंभार, संघटक आदिनाथ कांबळे, सचिव नीरज भालेराव, अनिल भंडारी, आनंद विजापूरे उपस्थित होते.

दिनांक ०२ नोव्हेंबर २०१७

डॉ.नरेंद्र दाभोलकर जयंती

# उर्दू शाळांना 'अच्छे दिन'

## सहा शाळांना मान्यता : बारा वर्षांचा वनवास संपला

**पिंपरी, दि. १८ (प्रतिनिधी)** - सहा उर्दू माध्यमिक शाळांना मान्यता मिळाल्याने उर्दू शाळांना आता चांगले दिवस आले आहेत. २००५ पासून रखडलेल्या उर्दू शाळांच्या मान्यतेअभावी बऱ्याच जणांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत होते. आठवीपर्यंतच मान्यता असल्याकारणाने पुढील शिक्षणासाठी उर्दूच्या विद्यार्थ्यांचे हाल होत होते.

माध्यमिकपर्यंतच्या दहावी पर्यंतच्या उर्दू शाळांना राज्य शासनाची मान्यता मिळाल्याने आता शिक्षणापासून वंचिताचा प्रश्न सुटला आहे. शिक्षणाविषयीची आस्था असलेल्या मुस्लीम बांधवामध्ये निर्माण झालेली मरगळ काही अंशी दूर झाली आहे. पिंपरी चिंचवड शहरात एकूणच उर्दू शिक्षण पद्धतीपासून वंचित असलेल्यांना आता मान्यतेमुळे उर्दू शाळांचे रूप बदलल्याचे चित्र पहावयास मिळणार आहे.

उर्दू शाळांना मान्यता मिळाल्याने पिंपरी-चिंचवड मुस्लीम विकास परिषद व पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट यांच्या वतीने तसेच अनेक मुस्लीम बांधव मान्यतेच्या निर्णयामुळे आनंदी आहेत. शिक्षणाची कवाडे यामुळे महिलांना खुली झाली आहेत. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या अखत्यारीत असलेली एकमेव उर्दू माध्यमिक शाळा कमी पडत असल्याने चार वर्षांपूर्वी शहरात सहा उर्दू माध्यमिक शाळा सुरू करण्यात आल्या. त्यासाठी मुस्लीम विकास परिषद व पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट या संस्थांनी पुढाकार घेतला. मात्र राज्य सरकारची मंजुरी नसल्याने या शाळांतील विद्यार्थ्यांना नोंदणी क्रमांक मिळत नव्हता. तसेच शिक्षकांना वेतनही मिळत नव्हते. अनेक संस्थांनी यासाठी वेळोवेळी पाठपुरावा केला. चार वर्षे पाठपुरावा केल्याने महापालिकेने हा प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठवला आणि त्या शाळांना अखेर राज्य सरकारची मान्यता मिळाली आहे. २०१४ मध्ये तत्कालीन प्रशासनाने काही अटींवर शहरातील सहा ठिकाणी नववी व दहावीचे वर्ग सुरू करण्यासाठी ठराव पारीत करून २०१४-१५ ह्या शैक्षणिक वर्षपासून सहा ठिकाणी नववी व दहावीचे वर्ग सुरू केले. शाळा सुरू झाल्यानंतर ह्या दोन वर्गांसाठी कायमस्वरूपी शिक्षक उपलब्ध नाहीत, त्यामुळे महापालिकेच्या वतीने तासिका प्रमाणे वेतन देऊन एका वर्गाला एक शिक्षक अशाप्रमाणे नेमणूक केली. परंतु, ९ वी व १० वी च्या वर्गांना सर्व विषय एकाच शिक्षकाने शिकवणे शक्य नसल्याने पिंपरी- चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या वतीने प्रत्येक वर्गाला अतिरिक्त एक शिक्षक देण्यासाठी पालिकेची मंजुरी घेतली. त्यास तत्कालीन शासनकर्त्यांनी त्या शिक्षकांचा पगार ट्रस्टने द्यावा या अटींवर मान्यता दिली. ठरल्याप्रमाणे ३० महिन्यापासून १२ शिक्षकांचे दरमहा सहा हजार रुपयांप्रमाणे वेतन पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या वतीने देण्यात आले. हे वेतन संस्थेचे कार्यकर्ते शहरातील काही निवडक मस्जिदीमधून लोक वर्गणी गोळा करून जमवत होते. यापुढे ११ वी १२ वीचे वर्ग सुरू करण्यासाठी संस्थेच्या वतीने प्रस्ताव दिला आहे. संस्थेचे पदाधिकारी अमीर शेख, शब्बीर शेख, रौफभाई कुरेशी, नादीर बेग, शफिउल्ला काझी, रयत विद्यार्थी विचार मंच संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे पाठपुरावा करीत आहेत.



### 'त्या' विद्यार्थ्यांना दिलासा...

शहरात सध्या १५ उर्दू प्राथमिक शाळा आहेत. या शाळांमधून आठवी पास झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आकुर्डी येथील माध्यमिक शाळेमध्ये प्रवेश घ्यावा लागत असे, परंतु आकुर्डीच्या शाळेमधील मर्यादित प्रवेश संख्या असल्याने ४५०-५०० विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी कुठल्याही प्रकारची सोय नव्हती. शिक्षणाअभावी सर्व गरीब विद्यार्थी घरी बसत असत. त्यामध्ये मुलींची संख्या ही लक्षणीय असायची. शिक्षणाची आवड असून देखील सोय नसल्याने हे सर्व विद्यार्थी गरीब कुटुंबातील असल्याने वेठबिगारीच्या कामासाठी आणि मंजुरीच्या कामासाठी जात होते. राज्य शासनाच्या वतीने उर्दु शाळांना मान्यता मिळाल्याने त्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

# शहरात सहा उर्दू शाळांना राज्य सरकारची मान्यता

**पिंपरी, ता. १९ :** सहा उर्दू माध्यमिक शाळांना मान्यता प्राप्त करून दिल्याबद्दल पिंपरी-चिंचवड मुस्लिम विकास परिषद व पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टने शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी बी. एस. आवारी यांचा सन्मान केला.

मुस्लिम विकास परिषद व पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट यांच्या पुढाकारातून चार वर्षांपूर्वी सहा उर्दू माध्यमिक शाळा सुरू केल्या. मात्र राज्य सरकारची मंजुरी नसल्याने विद्यार्थ्यांना नोंदणी क्रमांक व शिक्षकांना वेतन मिळत नव्हते. ट्रस्टने मंडळाकडे पाठपुरावा केला. त्यानंतर राज्य सरकारने शाळांना मान्यता दिली आहे.

अटीशर्तींप्रमाणे मागील ३० महिन्यांपासून १२ शिक्षकांचे दर महा सहा हजार रुपये या प्रमाणे वेतन देत आहे. ते संस्थेचे कार्यकर्ते व शहरातील काही निवडक मशिदींमधून लोक वर्गणी गोळा करून जमवत आहेत. या शाळांना शासन मान्यता मिळाल्याने आनंदाचे वातावरण आहे. या विद्यार्थ्यांसाठी ११ वी व १२ वीचे वर्ग सुरू करण्याचा प्रस्ताव दिला आहे. प्रशासन अधिकारी आवारी यांनी या प्रस्तावाबद्दल सरकारकडे पाठपुरावा केला. आकील मुजावर यांनी आवारी यांचे आभार मानले. अमीर शेख, शब्बीर शेख, रौफभाई कुरेशी, नादीर बेग, शफिउल्ला काझी, रयत विचार मंच अध्यक्ष धम्मराज साळवे उपस्थित होते.

# उद्योगनगरी में 6 उर्दू माध्यमिक विद्यालय मंजूर



**पिंपरी,** मुस्लिम विकास परिषद और पिंपरी चिंचवड़ एजुकेशन ट्रस्ट के प्रयास से 4 साल पहले शहर में 6 उर्दू माध्यामिक स्कूल शुरू किए गए, लेकिन राज्य सरकार से मंजूरी नहीं मिलने से स्कूल के विद्यार्थियों को पंजीयन नंबर और शिक्षकों को हर माह वेतन नहीं मिलता था। इसके लिए पिंपरी चिंचवड़ एजुकेशन ट्रस्ट की ओर से पीसीएमसी के शिक्षा मंडल से साल चार सालों से फॉलोअप लिया जा रहा है। आखिरकार राज्य सरकार ने स्कूलों को मंजूरी दे दी। इसमें अहम् भूमिका निभाने के लिए शिक्षा मंडल के प्रशासकीय अधिकारी बीएस आवारी को पिंपरी चिंचवड़ मुस्लिम विकास परिषद और पिंपरी चिंचवड़ एजुकेशन ट्रस्ट की ओर से सम्मानित किया गया।

पिंपरी चिंचवड़ शहर में 15 उर्दू प्राथमिक स्कूल है। 8वीं की परीक्षा उत्तीर्ण होने के बाद विद्यार्थियों को आगे की शिक्षा लेने के लिए आकुर्डी के माध्यमिक स्कूल में प्रवेश लेना पड़ता था, लेकिन यहां की प्रवेश क्षमता 450-500 है। ज्यादा विद्यार्थी संख्या के मुकाबले उन्हें कम सुविधा मिलती। प्रवेश नहीं मिलने से कई विद्यार्थियों को शिक्षा से वंचित रहना पड़ता था। पिंपरी चिंचवड़ मुस्लिम विकास परिषद और पिंपरी चिंचवड़ एजुकेशन ट्रस्ट ने सभी स्कूलों को मंजूरी दिलाने के लिए 2005 से फॉलोअप लिया जा रहा था। इसके बाद 2014 में प्रशासन ने कुछ शर्तों पर शहर में 6 स्कूलों को मंजूरी दी है। यहां पर 2014-15 से 9वीं और 10वीं के क्लास शुरू हो गए।

इसमें अस्थाई रूप से शिक्षकों की भर्ती की गई थी। मराठी मीडियम के प्रधानाध्यापकों को उर्दू भाषा की जानकारी नहीं होने के कारण उन्हें कई दिक्कतों का सामना करना पड़ता था। इसके चलते ट्रस्ट ने प्रत्येक क्लास के लिए अतिरिक्त एक शिक्षक देने की मांग की थी जिसे पीसीएमसी ने मंजूरी दी थी। उस दौरान सरकार ने ट्रस्ट को शिक्षकों का वेतन देने को कहा था। ट्रस्ट द्वारा पिछले 30 माह से 12 शिक्षकों को हर माह 6 हजार वेतन दिया गया था। शिक्षा अधिकारी बी. एस. आवारी ने इसके लिए काफी मेहनत ली है। इसलिए संस्था के अध्यक्ष अकील मुजावर ने उनका सम्मान किया है। इस अवसर पर अमीर शेख, शब्बीर शेख, रौफभाई कुरेशी, नादीर बेग, शफिउल्ला काजी और रयत विद्यार्थी विचार मंच के संस्थापक धम्मराज सालवे उपस्थित थे।

दिनांक ०२ नोव्हेंबर २०१७

रयत विद्यार्थी विचार मंच व मुस्लिम विकास परिषद यांच्या पाठपुराव्याने ६ उर्दू शाळांना मान्यता



**प्रशासन अधिकारी बी. एस. आवारी यांचा सन्मान करताना धम्मराज साळवे.**

## उर्दू शाळांच्या मान्यतेचा निर्णय स्वागतार्ह

**पिंपरी :** सहा उर्दू शाळांना मान्यता प्राप्त करून दिल्याबद्दल रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने या निणर्याचे स्वागत करण्यात आले. महापालिकेबरोबरच पिंपरी-चिंचवड मुस्लिम विकास परिषद व पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट, रयत विद्यार्थी विचार मंच या संस्थांनी पाठपुरावा केल्यानंतर अखेर सरकारने या शाळांना मान्यता दिली, अशी माहिती रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी दिली. संस्थेच्या कार्यकर्त्यांना मिळालेल्या या यशाचे व प्रशासन अधिकारी बी. एस. आवारी यांच्या पाठपुराव्याने मान्यता प्राप्त झाल्यामुळे रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन आवारी यांचा सन्मान करण्यात आला.

My Pimpri
Page No. 04 Nov 05, 2017
Powered by: erelego.com

दिनांक ५ नोव्हेंबर २०१७












## दिनांक ७ नोव्हेंबर २०१७
## बाबासाहेबांचा शाळा प्रवेश दिन

पिंपरी खराळवाडी उर्दू शाळेत बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन साजरा.यावेळी विद्यार्थ्यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे “विद्यार्थ्यांनो जागृत व्हा” हे पुस्तक भेट देण्यात आले.

पुढारी



रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने उर्दू माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी दिनानिमित्त पुस्तके वाटप करण्यात आली.

# उर्दू शाळेत विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप

**पिंपरी : प्रतिनिधी**

खराळवाडी रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने उर्दू माध्यमिक विद्यालयात विद्यार्थी दिनानिमित्त विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विद्यार्थ्यांना दिलेले संदेश असलेले 'विद्यार्थ्यांनो, जागे व्हा' या पुस्तकाचे व सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, कार्याध्यक्षा अंजना गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यानंतर जोहरा खान, तनझीला कुरेशी, सना शेख, समरीन अन्सारी या विद्यार्थिनींनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित मनोगत व्यक्त केले.

My Pimpri
Page No. 04 Nov 09, 2017
Powered by: erelego.com



पिंपरी : रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे उर्दू विद्यालयात विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला.

# रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे खराळवाडीत विविध उपक्रमांनी विद्यार्थी दिन साजरा

**पिंपरी, दि. ८ (प्रतिनिधी) –** रयत विद्यार्थी विचार मंचाच्या वतीने खराळवाडीतील उर्दू माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांसमवेत विद्यार्थी दिन साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, कार्याध्यक्षा अंजना गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. जोहरा खान, तनझीला कुरेशी, सना शेख, समरीन अन्सारी या विद्यार्थिनींनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित भाषण केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे संदेश असलेले 'विद्यार्थ्यांनो जागे व्हा' या पुस्तकाचे वाटप करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास रयत विद्यार्थी विचार मंचाचे उपाध्यक्ष संदेश पिसाळ, महासचिव संतोष शिंदे, कार्याध्यक्ष अंजना गायकवाड, खजिनदार शशिकांत कुंभार, संघटक आदिनाथ कांबळे, नीरज भालेराव, अनिल भंडारी, गौतम शिंदे, प्रणव गायकवाड आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन संतोष शिंदे यांनी केले. आभार नीरज भालेराव यांनी मानले.

# विभिन्न उपक्रमों से मनाया विद्यार्थी दिवस

**पिंपरी,** विभिन्न राजनीतिक पार्टी, संस्था और संगठनों की ओर से भारतरत्न डॉ. बाबासाहब आंबेडकर के स्कूल में प्रवेश का पहला दिन विद्यार्थी दिवस के रूप में मनाया गया। साथ ही विद्यार्थियों को स्कूली सामग्री का भी वितरण किया गया। पीसीएमसी की ओर से निबंध और चित्रकला प्रतियोगिता का आयोजन किया गया था। इसके अलावा पिंपरीनगर स्थित माध्यमिक विद्यालय में विभिन्न कार्यक्रमों का आयोजन किया था। इस अवसर पर स्थायी समिति की अध्यक्षा सीमा सावले, आयुक्त श्रावण हर्डीकर, नगरसेविका आशा धायगुडे, शिक्षाधिकारी बजरंग आवारी, सोमा आंबवणे समेत प्रधान अध्यापक, शिक्षक और विद्यार्थी बड़ी संख्या में उपस्थित थे।

लोकजनशक्ति पार्टी की पिंपरी चिंचवड़ इकाई की ओर से पिंपरी स्थित डॉ. बाबासाहब आंबेडकर स्मारक के पास प्रकाश उत्सव मनाया गया। डॉ. आंबेडकर ने 7 नवंबर को सातारा जिले स्थित श्री छत्रपति प्रतापसिंह स्कूल में पहली बार प्रवेश लिया था जिसे राज्य सरकार ने विद्यार्थी दिन के रूप में मनाया जा रहा है। पार्टी की ओर से विद्यार्थियों को स्कूली सामग्री का वितरण किया गया। इस अवसर पर पार्टी के जिला समिति के अध्यक्ष धुराजी शिंदे, प्रदेश सचिव सचिन जाधव, महिला विभाग की शहराध्यक्षा सरिता जामनिक, सुनील जामनिक, सचिव अरुण मैराले, कार्याध्यक्ष दत्ता गोडसे, चिंचवड़ विधानसभा क्षेत्र के अध्यक्ष दिनकर ओव्हाल, राहुल प्रधान,



अमोल सौदेकर, ज्योती म्हस्के, मुकेश पाटिल, मनोज गजभार, विनायक ओव्हाल, अंजना कांबले, निनाद जामनिक, सुदर्शन ओव्हाल, विक्रम मैराले, अवधुत ओव्हाल, दिक्षा मैराले, तनीष्का ओव्हाल, आम्रपाली ओव्हाल, आकांशा ओव्हाल और सिध्दार्थ ओव्हाल उपस्थित थे।

रयत विद्यार्थी विचार मंच की ओर से पिंपरी खरालवाड़ी स्थित उर्दू माध्यमिक विद्यालय में विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर की प्रतिमा पर मंच के संस्थापक अध्यक्ष धम्मराज सालवे, कार्याध्यक्षा अंजना गायकवाड के हाथों माल्यापर्ण किया गया। जोहरा खान, तनझीला कुरेशी, सना शेख, समरीन अन्सारी इन छात्राओं ने डॉ. आंबेडकर की जीवनी पर आधारित भाषण से उपस्थितों को संबोधित किया।

इसके बाद विद्यार्थियों को डॉ. आंबेडकर द्वारा विद्यार्थियों को दिए गए संदेश की पुस्तकें बांटी गई और उन्हें मिठाई भी बांटी गई। इस मौके पर मंच के उपाध्यक्ष संदेश पिसाल, महासचिव संतोष शिंदे, कोषाध्यक्ष शशिकांत कुंभार, संगठक आदिनाथ कांबले, नीरज भालेराव, अनिल भंडारी, गौतम शिंदे, प्रणव गायकवाड समेत स्कूल के शिक्षक, कर्मचारी आदि उपस्थित थे।

दिनांक ७ नोव्हेंबर २०१७

पिंपरी खराळवाडी उर्दू शाळेत बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश दिन साजरा

पुढारी

# ‘संविधान दिनानिमित्त विविध उपक्रम राबवावेत’


**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड पालिकेने सर्वसामान्य जनतेत व विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधान पोचवण्यासाठी २६ नोव्हेंबरला शहरामध्ये व शाळा-महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम राबवावेत, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचतर्फे करण्यात आली आहे.

याबाबत मंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दोन वर्षे ११ महिने १८ दिवस अहोरात्र कष्ट करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाला राज्यघटना दिली. २६ जानेवारी १९५० ला भारतीय राज्यघटना अस्तित्वात आली, तेव्हापासून आजपर्यंत या देशाने जी काही प्रगती केली त्याचे श्रेय भारतीय संविधानाला जाते, याचीच प्रचिती जाणून संपूर्ण शहरातील विद्यालयांमध्ये, वाचनालयांमध्ये संविधान प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात यावे; तसेच शहरातील विद्यालयांमध्ये, वाचनालयांमध्ये संविधान प्रति उपलब्ध कराव्यात. याचबरोबर निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, संपूर्ण शहरात संविधान प्रतिकृतीची शोभायात्रा काढण्यात यावी.




My Pimpri
Page No. 05 Nov 14, 2017
Powered by: erelego.com

दिनांक १४ नोव्हेंबर २०१७




## दिनांक २२ नोव्हेंबर २०१७

## संविधान दिन

रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त यांचेकडे संविधान दिनानिमित्त पिंपरी चिंचवड शहरातील शाळांमध्ये निबंध स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व विविध उपक्रम राबविण्यात यावेत अशी मागणी करण्यात आली होती त्यास मान्यता देत शिक्षण मंडळाने शाळेंना उपक्रम राबविण्याचे आदेश दिले..




## दिनांक २६ नोव्हेंबर २०१७

### माजी उपमुख्यमंत्री विद्यमान आमदार अजितदादा पवार यांना संविधान प्रास्ताविका भेट

संविधान दिनानिमित्त माजी उपमुख्यमंत्री विद्यमान आमदार अजितदादा पवार पिंपरी येथे संविधान दिनानिमित्त विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी आले असता रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने संस्थापक/ अध्यक्ष-धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते अजितदादा यांना संविधानाची प्रस्ताविका प्रतिमा भेट देण्यात आली.यावेळी त्यांना रयत विद्यार्थी विचार मंचची संकल्पना सांगण्यात आली दादांनी या संकल्पनेच कौतुक करून शुभेच्छा दिल्या.

# 'रयत'च्या वतीने संविधान प्रास्ताविका भेट

■ **पिंपरी** : येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा व संविधान प्रास्ताविका कोनशिलेला रयत विद्यार्थी विचारमंचाचे संस्थापक-अध्यक्ष धम्मराज साळवे आणि कार्याध्यक्षा अंजना गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून संविधानदिन साजरा करण्यात आला. या वेळी सामूहिक संविधान प्रास्ताविका उद्देशिकेचे वाचन करण्यात आले. यानंतर संस्थेच्या वतीने खराळवाडी येथील बालभवन प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालय तसेच उर्दू प्राथमिक शाळेत संविधान ग्रंथ व प्रास्ताविका प्रतिमा भेट देण्यात आली. त्याचबरोबर माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही धम्मराज साळवे व संतोष शिंदे यांच्या हस्ते प्रास्ताविका प्रतिमा भेट देण्यात आली. या वेळी संदेश पिसाळ, अंजना गायकवाड, शशिकांत कुंभार, आदिनाथ कांबळे, नीरज भालेराव, रोहित कांबळे, अजय शिंदे, महेश आल्हाट उपस्थित होते.

दिनांक २७ नोव्हेंबर २०१७







दिनांक २७ नोव्हेंबर २०१७

२६/११ मुंबईत ताज हॉटेलवर  वर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात वीर मरण आलेल्या शहीदांना रयत विद्यार्थी विचार मंच्याच्या वतीने श्रद्धांजली वाहताना संस्थापक अध्यक्ष मा.धम्मराज साळवे ,महासचिव संतोष शिंदे.







**दिनांक २७ नोव्हेंबर २०१७**

**संविधान_दिन**

संविधान_दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच(महाराष्ट्र राज्य) च्या वतीने उर्दू शाळा खराळवाडी पिंपरी शाळेला संविधान ग्रंथ आणि संविधान प्रास्तविका प्रतिमा भेट देण्यात आली यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी विद्यार्थ्यांना संविधानावर मार्गदर्शन केले.



रयत विद्यार्थी मंचच्या वतीने संविधान ग्रंथ उर्दू शाळेला भेट देण्यात आला.

# रयत मंचतर्फे संविधानदिन उत्साहात

**पिंपरी :** भारत देश ज्या महान ग्रंथावर चालवला जातो अशा भारतीय संविधानदिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व संविधान प्रास्ताविक कोनशिलेला संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे आणि कार्याध्यक्षा अंजना गायकवाड यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले. सामूहिक संविधान प्रास्ताविक उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.याबरोबरच मंचच्या वतीने खराळवाडी उर्दू प्राथमिक शाळा येथे संविधानदिन साजरा करण्यात आला. या वेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, सदस्य महेश आल्हाट यांच्या हस्ते संविधान ग्रंथ व प्रास्ताविक प्रतिमा रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या वतीने भेट देण्यात आले. प्रास्ताविकेचे विद्यार्थ्यांनी वाचन केले व अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी संविधानावर आधारित मार्गदर्शन केले.

दिनांक २७ नोव्हेंबर २०१७





दिनांक २७ नोव्हेंबर २०१७

संविधान_दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच(महाराष्ट्र राज्य) च्या वतीने माध्यमिक विद्यालय खराळवाडी पिंपरी शाळेला संविधान ग्रंथ आणि संविधान प्रास्तविका प्रतिमा भेट देण्यात आली यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनीविद्यार्थ्यांना संविधानावर मार्गदर्शन केले.

प्रभात





**खराळवाडी :** रयत विद्यार्थी विचारमंचाच्या वतीने माध्यमिक विद्यालय खराळवाडी शाळेला संविधान पुस्तिका भेट देताना अध्यक्ष धम्मराज साळवे, कार्याध्यक्षा अंजना गायकवाड आदी.

# संविधान दिनानिमित्त खराळवाडी शाळेला संविधान पुस्तिका भेट

**पिंपरी –** संविधान दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचारमंचाच्या वतीने माध्यमिक विद्यालय खराळवाडी शाळेला संविधान पुस्तिका आणि प्रास्तविक प्रतिमा भेट देण्यात आली. यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे, कार्याध्यक्षा अंजना गायकवाड, खजिनदार युवा पर्व, शशिकांत कुंभार यांच्या हस्ते भेट देण्यात आले. तसेच संविधान प्रास्ताविकाचे सामूहिक वाचन करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका उत्तरा कांबळे, उपाध्यक्ष संदेश पिसाळ, महेश आल्हाट, नीरज भालेराव, रोहित कांबळे, संतोष शिंदे, आदिनाथ कांबळे, अजय शिंदे आदी प्रमुख उपस्थित होते.

दिनांक २८ नोव्हेंबर २०१७









**दिनांक २८ नोव्हेंबर २०१७**

**संविधान_दिन**

संविधान_दिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंच (महाराष्ट्र राज्य) च्या वतीने प्राथमिक विद्यालय खराळवाडी पिंपरी शाळेला संविधान ग्रंथ आणि प्रास्ताविका प्रतिमा भेट देण्यात आली यावेळी संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे यांनी विद्यार्थ्यांना संविधानावर मार्गदर्शन केले. यावेळी सामूहिक संविधान प्रास्ताविक सामूहिक वाचन करण्यात आले.







दिनांक २८ नोव्हेंबर २०१७

संविधान_दिनानिमित्त  रयत विद्यार्थी विचार मंच(महाराष्ट्र राज्य) च्या वतीने विविध धर्मगुरूंना भारतीय संविधान व भारतीय संविधानाची प्रास्ताविका भेट देण्यात आली



## दिनांक ४ डिसेंबर २०१७

## भिडेवाड्याचे राष्ट्रीय शैक्षणिक स्मारकात रूपांतर करावे

भिडेवाड्याचे राष्ट्रीय शैक्षणिक स्मारकात रूपांतर करावे या मागणीचे निवेदन पुणे उपजिल्हाधिकारी राजेंद्र मुठे यांना रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे व प्रदेश महासचिव संतोष शिंदे यांच्या वतीने देण्यात आले

## 'भिडे वाडा शैक्षणिक स्मारक व्हावा'

पिंपरी : प्रतिनिधी

शैक्षणिक क्रांती घडवणाऱ्या भिडे वाड्याची दुरवस्था रोखून त्याचे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक स्मारकात रूपांतर करावे, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचतर्फे उपजिल्हाधिकारी राजेंद्र मुठे यांच्याकडे करण्यात आली आहे.

याबाबत मंचाचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, भिडे वाडा हा ऐतिहासिक आणि या देशाचा अमूल्य ठेवा आहे. भिडे वाडा हे या देशाचे राष्ट्रीय शैक्षणिक स्मारक आहे; परंतु आज पुणे महानगरपालिका व महाराष्ट्र शासनाच्या दुर्लक्षाअभावी भिडे वाड्याची खूप दुरवस्था झाली आहे. पूर्ण भिडे वाडा हा मोडकळीस आला आहे. शैक्षणिक क्रांती घडवणाऱ्या या स्मारकाची वाईट अवस्था पाहून आज आम्हा शिक्षणप्रेमींच्या भावना दुखावल्या जात आहेत.महात्मा फुले यांचा आदर करून लवकरात लवकर भिडे वाड्याची दुरुस्ती करून त्याचे रूपांतर आंतरराष्ट्रीय शैक्षणिक स्मारकात रूपांतर करावे, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दिनांक ०५ डिसेंबर २०१७



प्रभात

7/18

# भिडे वाडा राष्ट्रीय स्मारक करण्यासाठी प्रक्रिया सुरू करा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि.७** - महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी पुण्यातील भिडे वाडा येथे पहिली मुलींची शाळा सुरु केली. त्यामुळे भिडेवाड्याचे राष्ट्रीय स्मारक म्हणून जतन व्हावे, यासाठी पालकमंत्री गिरीश बापट यांनी मंत्रालयात गुरुवारी विशेष बैठक घेतली. भिडे वाडा राष्ट्रीय स्मारक होण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया तातडीने सुरू करावी अशी सूचना पालकमंत्री यांनी विधी व न्यायविभाग व पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

मुंबई येथे झालेल्या बैठकीत राज्य सरकारच्या वतीने विधी व न्याय विभागाचे उपसचिव पाटील, नगरविकास विभागाचे संजय गोखले, महसूल व वनविभागाचे सहसचिव गावडे, महापालिका उपायुक्त सतीश कुलकर्णी, तसेच स्मारक समितीच्या वतीने नगरसेवक महेश लडकत यांच्यासह सबंधित अधिकारी उपस्थित होते.

२०११ मध्ये तत्कालीन सरकारी वकिलांनी भूमिसंपादन अधिकाऱ्यांना दिलेल्या पत्रामुळे भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक करण्यासाठी लागणाऱ्या जागेचा ताबा देण्याची प्रक्रिया रखडली आहे, असे बापट यांच्याशी झालेल्या या चर्चेतून निर्देशनास आले. त्यामुळे या प्रकारातून तातडीने मार्ग काढण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी विधी व न्याय खात्याला दिली. संबंधित पत्रावर विधी व न्याय खात्याचे मत लवकरात लवकर कळवावे, अशी सूचना ही बापट यांनी यावेळी केली.


भिडेवाडा हे राष्ट्रीय स्मारक आहे. हा विषय सर्वांसाठी महत्वाचा आहे. या आधी या संदर्भात काय -काय कामे झाली याची माहिती एकत्र करून मला द्यावी, असा आदेश बापट यांनी या बैठकीत दिले आहेत.

या विषयाची कायदेशीर प्रक्रिया आणि त्या अनुषंगाने जागा ताब्यात घेण्याची प्रक्रिया यापुढील काळात कमीत कमी वेळेत होईल याबाबत नियोजन करा अशा सूचना बापट यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी भिडेवाड्यासंदर्भात २००० नंतरच्या काळात झालेली दिरंगाई समजून घेऊन त्याबाबत बापट यांनी नापसंती व्यक्त केली. अशी दिरंगाई यापुढे खपवून घेणार नाही असेही बापट यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना सांगितले.

## दिनांक ०७ डिसेंबर २०१७

## भिडेवाड्याची दुर्दशा

भिडेवाड्याचे राष्ट्रीय शैक्षणिक स्मारकात रूपांतर करावे या मागणीचे निवेदन दिनांक ४ डिसेंबर २०१७ रोजी पुणे उपजिल्हाधिकारी राजेंद्र मुठे यांना रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीने संस्थापक/अध्यक्ष धम्मराज साळवे यांच्या अध्यक्षतेखाली शिष्टमंडळाच्या वतीने देण्यात आले.त्यांनतर दिनांक ६ डिसेंबर २०१७ रोजी तत्कालीन पुणे जिल्हा पालकमंत्री गिरीश बापट यांनी भिडे वाड्याचे स्मारक करण्यासंदर्भात आदेश दिले होते. रयत विद्यार्थी विचार मंच शेवटपर्यंत स्मारकासाठी पाठपुरावा करणार.



## दिनांक ४ डिसेंबर २०१७

## मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय चुकीचा

मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय चुकीचा महाराष्ट्रातील १३१४ मराठी शाळा बंद करणे हा काही पर्याय नसुन त्याऐवजी सरकारने उपाययोजना करून मराठी शाळांचे डिझीटलायझेशन केल पाहिजे. मराठी बरोबरच इंग्रजी विषयाचही शिक्षण द्यावे. या मागणीचे निवेदन रयत विद्यार्थी विचार मंच च्या वतीचे पुण्याचे उपजिल्हाधिकारी राजेंद्र मुठे यांना देण्यात आले.

प्रभात

3/16

मुख्याध्यापिका रजनी सैयद यांनी स्वागत केले. विषयतज्ज्ञ बाळासाहेब जाधव, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य सुभाष चटणे, रहिंज शामला, वैशाली तवटे, दिनेश जगताप, स्मिता उत्तेकर, मुख्याध्यापक भारत मिरगणे यांनी मनोगत व्यक्त केले.

## मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय मागे घेण्याची मागणी

**पिंपरी** – महाराष्ट्र राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी पटसंख्येअभावी राज्यातील १३१४ मराठी शाळा बंद करण्याचा निर्णय मागे घ्यावा. मराठी शाळा बंद करणे हा पर्याय असू शकत नाही, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचाच्या वतीने करण्यात आली आहे. जागतिकीकरणाच्या दृष्टीने इंग्रजी शाळांचे महत्त्व वाढत आहे, परिणामी मुलांना इंग्रजी शाळेत शिक्षणासाठी पाठवण्यास पालकांचा कल वाढलेला आहे. परंतु, इंग्रजी शाळांची होणारी झपाट्याने वाढ व इंग्रजी शाळामध्ये मिळणाऱ्या अत्याधुनिक सुविधा पाहता व त्याची तुलना मराठी शाळांबरोबर केली तर मराठी शाळा या ओस पडत चालल्या आहेत. मराठी शाळांमध्ये आजही सोईसुविधा व योग्य दर्जाचं शिक्षण व अत्याधुनिक तंत्रज्ञान मिळेनासे झाले आहे हा देखील विचार करणे गरजेचे आहे. इंग्लिश माध्यमाच्या शाळा खोटी प्रलोभने दाखवून शिक्षणाच्या नावावर पैसे उकळत आहेत. याचा परिणाम मराठी शाळांवर होत आहे. अशा शाळांवर सरकारने अंकुश ठेवणे गरजेचे आहे, असे रयत विद्यार्थी मंचने म्हटले आहे.

दिनांक ०५ डिसेंबर २०१७






**दिनांक ४ डिसेंबर २०१७**
**जागतिक अपंग दिन**

नवा सोबती अपंग संस्था व रयत विद्यार्थी विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक अपंग दिन अपंग बांधवासोबत साजरा करण्यात आला.यावेळी सर्व अपंग बांधवांचा गुलाबपुष्प व पेन देउन रयत विद्यार्थी मंचातर्फे सत्कार करण्यात आला.व अपंगासाठी महापालिकेच्या योजनांची माहीती असलेले परिपत्रक अपंग बांधवांना देण्यात आले.

# ‘नवा सोबती’ संस्थेच्या वतीने अपंगदिन साजरा

**पिंपरी : प्रतिनिधी**

नवा सोबती अपंग संस्थेच्या वतीने रविवारी (दि. ३) जागतिक अपंगदिन साजरा करण्यात आला. या वेळी संस्था तसेच रयत विध्यार्थी विचारमंचाच्या पदाधिकाऱ्यांनी दिव्यांग व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीच्या ध्येयधोरणांबाबत चर्चा केली.

दिव्यांग बांधवांनी आत्मविश्वासाच्या जोरावर अपंगत्वावर मात करून स्वतःसोबतच सामाजिक प्रगतीसाठी काम करणे आवश्यक असल्याचे मत संस्थेचे संस्थापक व महासचिव संदेश पिसाळ यांनी व्यक्त केले.

या वेळी रयत विद्यार्थी मंचाचे धम्मराज साळवे, महासचिव संतोष शिंदे, रोहित कांबळे, नीरज भालेराव, अंजना गायकवाड, शशिकांत कुंभार, संस्थेचे उपाध्यक्ष अमोल कांबळे, कार्याध्यक्ष दिनेश कांबळे, सचिव संजय धोंगडे, गौतम सोनटके, विकास भोसले, गणपत कुळे, सचिन वाघमारे, प्रवीण कांबळे, संकल्प गोळे आदी उपस्थित होते.

दिनांक ५ डिसेंबर २०१७



## दिनांक १४ डिसेंबर २०१७

## पिंपरी येथील नियोजित सावित्रीमाई फुले वाचनालयाच्या इमारतीत बदल नको

पिंपरी येथील नियोजित सावित्रीमाई फुले वाचनालयाच्या इमारतीत पिं.चिं. महापालिका जागा कमी पडतेय अशी कारणे दाखवुन महापालिकेचे काही विभाग सावित्रीमाई फुले वाचनालयाच्या इमारतीत शिफ्ट करू पाहात होती .या निर्णयाला विरोध रयत विद्यार्थी विचार मंच संस्थेने केला व अन्य संघटनानीही केला. परंतु महानगरपालिकेकडुन समाधनकारक उत्तर न मिळाल्यामुळे शहरातील सर्व सामाजिक संघटनांनी एकत्र समिती बनवुन आज महापौर/पक्षनेते यांची भेट घेऊन या प्रश्नाबाबत चर्चा केली.व महापौर यांनी समाधानकारक चर्चा केली व सावित्रीमाई फुले वाचनालय इमारत ही केवळ त्यासाठीच वापरण्यात येईल असे आश्वासन दिले.



दिनांक २० डिसेंबर २०१७

संत गाडगे बाबा यांच्या स्मृतिदिनानिमित्त  संस्थेच्या वतीने अभिवादन करताना



## गाडगे महाराजांना अभिवादन

**पिंपरी :** राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या स्मृतिदिनानिमित्त रयत विद्यार्थी विचार मंचतर्फे गाडगे महाराजांना अभिवादन करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी या वेळी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. या वेळी महासचिव संतोष शिंदे, उपाध्यक्ष संदेश पिसाळ, शशिकांत शिंदे, अंजना गायकवाड, मेघा आठवले आदी उपस्थित होते.

My Pimpri
Page No. 04 Dec 21, 2017
Powered by: erelego.com

# संत गाडगे महाराज यांना अभिवादन

**पिंपरी** : रयत विद्यार्थी विचार मंचच्या वतीने राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या स्मृतिदिना निमित्त संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धम्मराज साळवे व महासचिव संतोष शिंदे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण अभिवादन करण्यात आले. यावेळी संदेश पिसाळ, शशिकांत शिंदे, अंजना गायकवाड, मेघा आठवले, आदिनाथ कांबळे, नीरज भालेराव, रोहित कांबळे, अनिल भंडारी, नितीन पाटील उपस्थित होते.

दिनांक २१ डिसेंबर २०१७
राष्ट्रसंत गाडगे महाराज स्मृतिदिन

## सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त उपक्रम राबवा

पिंपरी : स्त्रीशिक्षणासाठी लढा देणाऱ्या व पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले जावेत, अशी मागणी रयत विद्यार्थी विचारमंचाने केली आहे. याबाबत संस्थेचे अध्यक्ष धम्मराज साळवे, अंजना गायकवाड, मेघा आठवले यांनी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले. त्यात म्हटले आहे की, पालिकेच्या सर्व शाळांमध्ये सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर व कार्यावर आधारित निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, एकांकिका, नाटक, मार्गदर्शन कार्यक्रम घ्यावेत. नव्याने तयार झालेल्या सावित्रीबाई फुले स्मारकामध्ये विविध प्रबोधनपर कार्यक्रम घ्यावेत. तसेच त्यांच्या जीवनावर आधारित चित्र प्रदर्शन आयोजित करावे. महिला सक्षमीकरणाबाबत परिसंवाद आयोजित करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे

पुढारी

संक्षिप्त

## 'सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विविध उपक्रम राबवावेत'

**पिंपरी** : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महापालिकेने पिंपरी येथील नव्याने तयार झालेल्या सावित्रीबाई फुले स्मारकामध्ये विविध प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन करावे; तसेच त्यांच्या जीवनावर आधारित चित्रप्रदर्शन आयोजित करावे, अशी मागणी रयत विद्यार्थी मंचच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत मंचचे अध्यक्ष धम्मराज साळवे यांनी आयुक्त श्रावण हर्डीकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, स्त्री शिक्षणासाठी लढा देणाऱ्या पहिल्या महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांची जयंती ३ जानेवारी रोजी असून, या दिवशी महापालिकेतर्फे विविध मार्गदर्शनपर कार्यक्रम राबविण्यात यावेत. महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर व कार्यावर आधारित निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, एकांकिका , मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दिनांक २७ डिसेंबर २०१७

सावित्रीमाई फुले जयंतीनिम्मित पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विविध उपक्रम राबवावेत.रयत विद्यार्थी विचार मंचाची आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्याकडे मागणी


Thank you